मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

★ या अंकांतील लेखक ★

सौ. उषा कोलते

रा. ब. गो. स. सरदेसाई

प्रा. अ. ना. देशपांडे

साहित्यानंद

बा. बा. पाटणकर

वा. ना. देशपांडे

गो. रा. दोडके

द. चिं. सोमण

★

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक

वा. ना. देशपांडे

जून १९४७

किंमत ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

अनुक्रमणिका

कविता

१ प्रतिमापूजन–प्रा. भ. श्री. पंडित, एम्. ए. ...१६९
२ वादळा !–द्वारकानाथ चित्रे ...१७०
३ उषा–प्रा. दा. ल. अडोणी, एम्. ए. १७०
४ या लुटा, लुटा !–मा. नी. गल्गलीकर, बी. ए....१७१
५ कला आणि मृत्यु–प्रा. ना. वा. शास्त्री, एम्. ए....१७१

थोरांचा परिचय

१ विष्णु भिकाजी कोलते– सौ. उषा कोलते, एम्. ए. ... १७२
२ दोन राजर्षि–सयाजीराव गायकवाड– रा. ब. गो. स. सरदेसाई, बी. ए. १७६

प्रबंध

१ वाङ्मयाचें मूल्यमापन– प्रा. अ. ना. देशपांडे, एम्. ए. १८१
२ साहित्याच्या सृष्टींत–'साहित्यानंद'...१८८
३ हाक्यांतील वाघ–वा. बा. पाटणकर, बी. ए., एल्. एल्. बी....१९२
४ महानुभाव-वाङ्मयाचें संशोधन– वा. ना. देशपांडे १९५

ललित गद्य

१ स्वयंसेवक–गो. रा. दोडके, बी. ए....१९८
२ 'ला बेल सूझन'–द. चिं. सोमण...२०१

विविध

१ साहित्य समालोचन–संपादक ...२०३
२ शंका : चर्चा : समाधान–
१ मो. रा. जोशी
२ डॉ. य. खु. देशपांडे...२०५
३ संपादकीय ...२०६
४ मंडळवार्ता ...२०७

ADVERTISEMENT

TARIFF OF YUGWANI

Mech. Details.

Length of a Column.	9 Inches
Breadth of a column.	14 Ems. i. e. 1·33″
Per Single Col. Inch	
Per Insertion	Rs. 2–0
Two Insertions	Rs. 1–12
Three Insertions	Rs. 1–8

(Inside)

Full Length one Col.	Rs. 13
Full Page	Rs. 25

Contract Rates

Full Page	Rs. 30
Half Page	Rs. 16
Quarter Page	Rs. 8

More Details On Querry.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष २ रें
अंक ६ वा

: संपादक :
वामन नारायण देशपांडे

जून
१९४७

प्रतिमापूजन

★

मला आवडे प्रतिमा
भाव शुध्दतम जो हृदयीं मम
तोच तींत परमात्मा ! ॥ धृ० ॥

कोरककोषीं सुवास वासी–
तसा, कळे मज उपमा ;
सूक्ष्मतेंत तो ओशाळवितो
तरल विरल या धूमा ॥ १ ॥

तो पवनाहुन चंचल, दृश्य न,
अनेक त्याच्या अनुमा,
येई अनुभव त्यास नसे लव,
जड शब्दांची सीमा ॥ २ ॥

अपरोक्षांतुन परोक्षांत मन
नागांतून अनामां
प्रतिमेवाचुन हो संतुष्ट न
कधीच हा जीवात्मा ! ॥ ३ ॥

—भवानीशंकर श्री. पंडित.

प्रा. भ. श्री. पंडित यांनी ‘प्रतिमा पूजना’ चें केलेलें या कवितेंतील समर्थन काव्यमय व सूचक आहे. शब्द तर फारच वेचक पडले आहेत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वादळा !

● नाशिकचे कवि द्वारकानाथ चित्रे यांनी वादळास केलेलें हें आवाहन त्यांच्या हृदयांतील वादळाची कल्पना आणून देते.

निश्चय वादळा ! कर तूं फिरून,
भीषण लोटांत गर्जत येऊन !
उफाळून दे तूं निश्चळ सागर –
वृक्ष–पर्णांचा हा शिथिल संभार !
लोटाच्या वेगांत
ये रे तूं गर्जत —
मन्मनांत तसा थैमान घालीत !
—दूरच्या तारांत नको ती गूढता
मारून भरारी शोध घे तूं अता !

✣ ✣ ✣

स्तब्धता कशाला–शीतल केवळ —
विसावेत जीव काळाकाळांतून ?
पर्वत–कडे हे पहा उभारून
राहिले उभे रे युगायुगांतून !
संथ त्या जीवना......
अनन्त यातना !
कोन्दल्या मन्मनीं ऐशाच भावना !
गर्जत गर्जत ताण्डव करीत –
जा रे जा वादळा ! तयांना भेदीत !

✣ ✣ ✣

नक्षत्र–तारांचा रोजचा पसारा
वृक्षपर्णांना रे रोजचाच वारा !
खळाळून दे तूं सैल हें जीवन —
उल्कापात हो की वृक्ष हे भेदून !
निर्मळ वाटेंत —
उज्ज्वल संकेत !
उजळूं दे अता शिथिल जीवित !
उफाळून दे तूं प्रचण्ड सागरा —
गर्भिचीं रत्नें तीं लाभूं दे मण्डला !

✣ ✣ ✣

वादळा ! मन्मनीं चाल घे अशीच
एकेरी जीवना...कापीत कापीत !
नको तें निष्प्रभ नको तें जीवन,
नको रे वादळा ! मरणें कुढून !
—थैमान घालीत
ये रे तूं गर्जत
उजळ माझें हें भ्रमिष्ट जीवित !
ये रे ये वादळा ! धाव की घालीत
उजळ जीवना—गर्जत गर्जत !

—द्वारकानाथ चित्रे

●

उषा

(ऋग्वेदः मंडल ६ : सूक्त ६५)

● सागरचे प्रा. दा. ल. अडोणी यांनी ऋग्वेदांतील उषःसूक्तांचे जे अनुवाद केलेले आहेत, त्यांपैकी एक आज आणखी देण्यांत येत आहे.

द्युलोकीं जी झाली विकसित उषा स्वर्गदुहिता
प्रभेनें नाशोनी तिमिर, विलसे भूवर अता
उषा दीप्तीयुक्ता गगनभुवनीं आज दिसते
निशेच्या अंधारा सहज अवला नष्ट करते. १

महावेगें जाती वसुनि रुचिर स्यंदनिं उषा
प्रभातीं यज्ञाला अरुण–हययोगें वध कशा !
विचित्रावर्णांच्या वितरुनि विभेला विलसती
निशेच्या अंधारा सहज अवला नष्ट करती. २

तुम्हांलागी प्रेमे भजक 'हवि' जे अर्पिति नित्त
तयांसाठी कीर्ती, विभव, बल अन्नादिसहित
अहो ! येतां तुम्ही अचपलपणें हे भगवती !
समर्पा भक्तांना सुतविभवधान्यादि जगतीं. ३

अता तुम्हांपाशी विपुल धन भक्तार्थ विलसे
समर्पाया दात्या रणकुशलशा संचय वसे
तशा देतां द्रव्य स्तवनपटुला ज्ञानविरत
उषे ! सोमाशाती मजसम तयां द्या धन नित. ४

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उषे ! शैलाग्रीं तूं उदित नित होतेस गगनीं
विमुक्तीला धेनूकरनिकर नेती प्रतिदिनीं
स्तुतिस्तोत्रांनी जे तिमिर हरती अंगिरस ते
उषे ! नेत्यांचें त्या स्तवन सकलां सार्थ गमते. ५

उषे ! आम्हांलागी दुरि करि यथापूर्व तिमिर
भरद्वाजातुल्य प्रणत नर जे सेविति चिर—
तसे जे स्तोत्रांनी सुखविती तयां पुत्र सबल
समर्पा ऐश्वर्यासह, मजसि दे अन्न रुचिर. ६

—दा. ल. अडोणी.

●

या लुटा, लुटा!

● नागपूरचे कवि मा. नी. गलगलीकर यांची ही कविता चालू परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वाचल्यास तिचें स्वारस्य चटकन् कळेल.

सवंग झालें मानवजीवित !
—या लुटा, लुटा
या लुटा, लुटा !

धन्य वाटतो मनुज-जन्म का ?
—त्यजा वेडपट खुळी कल्पना !
बांधा कमरा
मागे न सरा !
आणि परजवा शस्त्रें सगळीं
गिधाडांस द्या सोबत अपुली !
नरमेधांचे करा मनसुबे
शिरकमलांचे रचा मनोरे !
आणि कबंधें तशीं लढूं द्या,
त्यांस सुन्यांचे हात फुटूं द्या !
सार्वभौमता तुम्हां मिळूं द्या !
अन् विजयाचे स्तंभ उभारा !

मांस शोणितें धरतीवरतीं
खतास आली उमाप भरती—
त्यांत दुर्दैवीं पीक येउं द्या,
आणि सुगीचें गीत गाउं द्या !

सवंग झालें मानवजीवित !
—या लुटा, लुटा
या लुटा, लुटा !

—मा. नी. गलगलीकर.

●

कला आणि मृत्यु

● बिलासपूरचे प्रा. ना. बा. शास्त्री यांच्या हळुवार रसिकतेची ही कविता द्योतक आहे.

येईल तो दिन जधीं त्यजुनी धरेसी
जाईल जीवनकळी वर दिव्य देशीं
भूगर्भ नश्वर तनू उदरीं धरील
नांवास एक थडगें वरती उरेल !

येतील कल्पक कुणी किति शिल्पकार
देतील बांधुनि वरी कळसास थोर
कालान्तरें पथिकही जमती बघाया
मानून मोद परते फिरतील जाया !

पाहील कोण थडगें परि त्यामधील ?
साधें तृणांकित कसें मन तोषवील ?
—बोलेल वा कुणि गिरा कटु भावनेने
"केलें विशोभित कसें कळसास याने !"

—ना. बा. शास्त्री.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विष्णु भिकाजी कोलते

सौ. उषा कोलते,
एम्. ए.

● प्रसिद्ध महानुभाव-वाङ्मय-संशोधक प्रा. वि. भि. कोलते यांचा हा परिचय-लेख त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. उषाबाई कोलते यांनी लिहिलेला असून तो प्रा. कोलते यांच्या अंतरंगावर प्रकाश टाकणारा आहे.

★ ★ ★

ते बाजारचा दिवस होता. नेहमीप्रमाणे माझ्याकडे येणारा खेड्यावरचा लोणीवाला आला. लोणी घेऊन मीं त्याला पैसे दिले. त्यांत एक किंचित् गुळगुळीत असा रुपया होता. कोणीतरी फसवून तो प्रा. कोलत्यांच्या माथीं मारला होता! मला तो चालवायचा होता. पुष्कळ फेरीवाल्यांच्या हातांत तो टाकण्याचा मीं प्रयत्न केला होता. पण तो फसला होता! तोच रुपया मीं त्या दिवशीं लोणीवाल्याला दिला. माझ्यावर विश्वासून म्हाताऱ्याने पैसे खिशांत घातले व तो चालूं लागला! रुपया 'चालला' म्हणून माझ्या व्यवहारी मनाला धन्य वाटलं! तो जातांच माझी ही व्यवहार-कुशलता मी प्रा. कोलते यांना सांगितली. मला वाटलं, मला शाबासकी मिळेल! पण छे! माझा अपेक्षाभंग झाला! मला फक्त 'शालजोडी' तले मिळाले!

"तूं खेड्यांतल्या एका सरळ माणसाला फसवलंस, हें बिलकूल बरं केलं नाहीस! खरंच, मला हें अगदी आवडलं नाही!. जो विचारा खेडूत शहरी व्यापाऱ्याप्रमाणे मिसळ न करतां तुला शुद्ध लोणी प्रामाणिकपणाने नियमित आणून देतो, त्यालाच तूं तो रुपया द्यायला धजलीस...!"

गोष्ट साधी व लहानशीच! पण त्यावरून प्रा. कोलते यांची खेडुतांविषयींची आस्था दिसून येते! त्यांचा जन्म वऱ्हाडांतील नरखेल या खेड्यांतला. खेड्यांतील जीवन ते जगले आहेत. विद्यार्जनाकरिता व नंतर अध्यापनासाठी म्हणून त्यांचा बराचसा काळ शहरांतहि गेलेला आहे. त्यामुळे त्यांना खेडुतांची व शहरवासियांची खरी व पुरी ओळख पटलेली आहे. बहुजनसमाजाविषयीं कोणी विपर्यस्त विधानें केलीं की, ते संतापतात! त्या समाजाचा प्रामाणिकपणा, भाबडेपणा, अज्ञान या दुर्गुणां (?) मुळे त्याची गळचेपी झालेली दिसली, म्हणजे त्यांचं अंतःकरण तळमळतें! खेड्यांतील कोणत्याहि कार्यक्रमाचं बोलावणं येवो, त्याला त्यांच्याकडून सहसा कधीहि नकार मिळायचा नाही!

सरकारी नोकरीमुळे सुदैवाने त्यांना जीवनांत स्वास्थ्य मिळालें असलें, तरी त्यांचा जीवनक्रम अगदीच साधा आहे. विद्यार्थिजीवनांत ते नियमित व्यायाम घेत असतच, परंतु अद्यापहि रोज सकाळीं उठतांच २०-२५ मिनिटें तरी व्यायाम केल्यावाचून त्यांना चैन पडत नाही. कॉलेजमध्ये जाण्यापूर्वी ते नेहमी शिकविण्याच्या पाठाचा सूक्ष्म व व्यवस्थित अभ्यास करतात. अभ्यासासाठी त्यांना नागपूरच्या शहरी जीवनापेक्षा उमरावतीचं एकांतप्रिय व अभ्यासानुकूल असं वातावरण अधिक आवडतें. अजूनहि उमरावतीला बदली झाली, तर त्यांना कोण आनंद होईल!

जिज्ञासू विद्यार्थ्यांशी वाङ्मयविषयक चर्चा करण्यास त्यांना अपूर्व उत्साह वाटतो. सर्व विद्यार्थ्यांशी ते अत्यंत मनमोकळेपणाने वागतात. उमरावतीला येतांच प्रथम माझ्या लक्षात कोणती गोष्ट आली असेल, तर ती ही! कॉलेजमधून आल्यावर नेहमी मी चहासाठी त्यांची वाट पाहत बसावं. पण बाहेर पहावं तों कोणीतरी विद्यार्थी आलेले असायचे आणि हे त्यांच्याबरोबर बोलत बसलेले असायचे! अशी चीड यायची मला! विशेषेकरून पुण्याच्या फर्ग्युसनमध्ये किंवा नाशिकच्या हं. प्रा. ठा. मध्ये विद्यार्थी व प्राध्यापक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांच्यांत इतकं खेळीमेळीचं नातं क्वचीच न दिस- ल्यामुळे आश्चर्यच वाटायचं मला !

प्रा. कोलत्यांचं मन विशेषेंकरून कशांत रंगत असेल, तर तें अभ्यासांत ! त्यांनी आपल्या कामासाठीं शाखा निवडली आहे ती संशोधनाची. रोजचा व्यवसाय संभाळून ६-७ वर्षें परिश्रम करून मागच्याच वर्षी त्यांनी ' महानुभाव तत्वज्ञान ' नांवाचा ५०० पानांचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. अद्यापि एवढ्याच आकाराचे ' आचार ' व ' विमर्ष ' असे दोन खंड प्रसिद्ध व्हायचे आहेत. ते शक्य तितक्या लवकर निघा- वेत म्हणून सध्या त्यांची धडपड चालू आहे. अप्रसिद्ध अशा महानुभाव वाङ्मयाच्या प्रसिद्धी- साठी एक मासिकहि काढण्याचा त्यांचा इरादा आहे. त्यांच्या अभ्यासू वृत्तींतूनच त्यांच्या हातून नरेंद्राचें ' रुक्मिणीस्वयंवर, ' भास्करभट्टाचें ' उद्धवगीता ' हीं काव्यें व ' श्रीगोविंद प्रभुचरित्र ' हा गद्यग्रंथ यांचें विस्तृत प्रस्तावनांसहित संपादन झालें. ' भास्करभट्ट बोरीकर ' या विवेचनात्मक ग्रंथामुळे तर त्यांनी महानुभाव वाङ्मयाच्या संशोधनाला अभिनव अशी शास्त्रीय दृष्टि दिली. तत्पूर्वी महानुभावीय संतमहंतादिकांनी पुरविलेल्या माहि- तीवरच बहुतेक संशोधक विसंबून असत ![1] परंतु प्रा. कोलते हे ही माहिती उपलब्ध करूनच थांबले नाहीत, तर ती बरोबर आहे की नाही, याची शास्त्रीय छाननी करण्याचा पायंडा त्यांनी पाडला. यामुळेच भास्करभट्ट बोरीकरकृत ' शिशुपालवध ' या काव्याच्या कालनिर्णयाच्या बाबतींत वादाचं केवढं रण माजलं ! त्यांत नागपूरचे म. म. कृष्ण- शास्त्री घुले, माहूरचे महंत श्रीदत्तलक्षराज, त्यांचे शिष्य बाळकृष्णशास्त्री महानुभाव, रितपूरचे यक्षदेव महंत, भुसावळचे मुरलीधरशास्त्री-वगैरे रथी-महारथी आखाड्यांत उतरले होते ! महा- नुभावीय वाङ्मय व तत्पंथीय लोक यांच्याशी त्यांचे संबंध इतके जिव्हाळ्याचे आहेत की, आता त्यांनी पंथाची दीक्षाच काय ती घ्यायची राहिली आहे ! सुरवातीला मी उमरावतीला आलें, तेव्हा आमच्याकडे नेहमी महानुभाव मंडळीचं ठाण मांडलेलं असायचं !

वरील पुस्तकांशिवाय त्यांचे संशोधनात्मक असे फुटकळ लेख बरेच आहेत. अजून ते संग्रहरूपानें मात्र संकलित झालेले नाहीत. त्यांच्या बहुतेक लेखांतून कांहीतरी नवीन विचार प्रदर्शित केलेले आढळतात. या दृष्टीनें ' नलदमयंतीस्वयंवर ' कर्ते रघुनाथ पंडित हे मोरोपंतानंतरचे आहेत असें दाखविणारा ' फुलोर ' मधील लेख, ' आज्ञापत्र ' हें रामचंद्रपंत अमात्याचें नसून नीळकंठ मोरेश्वर पिंगळे यांचें आहे असें प्रतिपादन करणारा 'सरदेसाई-स्मारक-ग्रंथां'तील ' राजनीति अमात्यांची कशी ? ' या मथळ्याचा लेख, ' कालिदासाच्या नाट्ययशाचें रहस्य ' हा ' विहंगमां ' तील अभिनव दृष्टीचा निबंध-हे अवश्य वाचून पाहण्यासारखे आहेत. रघुनाथपंडिताच्या कालनिर्णयाच्या बाबतींत त्यांचे प्रिय मित्र प्रा. भ. श्री. पंडित यांच्याशिवाय त्यांना कोणी पाठीराखा मिळाला नसला, तरी ' आज्ञापत्रा ' चा कर्ता रामचंद्रपंत अमात्य नव्हे, या त्यांच्या मताला अनेकांनी मान्यता दिल्याचें दिसतें.

संशोधनाचं काम एकंदरींत रूक्षच ! त्यामुळे प्रा. कोलते गंभीर स्वभावाचे व रूक्ष प्रवृत्तीचे असावेत, असं वाटण्याचा संभव आहे. परंतु वस्तुस्थिति तशी नाही. ते हाडाचे रसिक आहेत. त्यांच्या संभाषणांतून नेहमी विनोदाची पखरण असते. कथाकीर्तनें ऐकण्यांत त्यांना अतिशय आनंद वाटतो. गाण्याची मैफल असली म्हणजे ते लागलीच दंग होतात ! गेल्या जुलैमध्ये तर गाणें शिकण्याची लहर आल्यामुळे धंतोलीवरील रा. सप्रे, प्रवर्तक इत्यादिकांच्या गायनशाळांत त्यांनी खेपाहि घातल्या, हें सांगितलं तर कुणाला तें खरंहि वाटायचं नाही ! पण वेळ जुळत नसल्या- मुळे मात्र त्यांचा तो उत्साह जागच्या जागींच

---

१ सौ. उषाबाई कोलते यांच्या या विधाना- बाबत विस्तृत खुलाशाची आवश्यकता असल्यामुळे तसा प्रयत्न याच अंकांत अन्यत्र केलेला आहे.

—संपादक ' युगवाणी '

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जिरला! नाट्याचीहि त्यांना मनापासून आवड आहे. उमरावतीला त्यांच्या कार्याध्यक्षत्वाखाली मराठी नाट्यशताद्वि महोत्सव कशा नाविन्यपूर्ण रीतीने साजरा झाला होता, याची आठवण उमरावतीकरांना अजून असेलच, त्यावेळीं 'संशयकल्लोळां'-तील त्यांनी केलेली भादव्याची भूमिका उत्कृष्ट वठली होती. आणि, गेल्या वर्षी मॉरिस कॉलेजच्या हीरक महोत्सवाच्या वेळीं 'घराबाहेर' नाटकातील त्यांची आबासाहेबाची भूमिका नागपूरकर प्रेक्षकांना अतिशय आवडली होती. उमरावतीला स्थापन झालेल्या 'विदर्भनाट्यमंदिरा'चे ते अध्यक्ष आहेत, हीहि गोष्ट त्यांच्या नाट्यप्रेमाची द्योतक म्हणून सांगतां येईल.

त्यांच्या रसिकतेची साक्ष देण्याला त्यांचा 'लव्हाळीं' नांवाचा काव्यसंग्रह व 'सोडचिठ्ठी' नांवाची दोन अंकीं विनोदी नाटिका हीं पुरेशीं आहेत. 'सोडचिठ्ठी' या अभिधानावरून त्यांत घटस्फोटाच्या सामाजिक प्रश्नांची गंभीर चर्चा असावी, असं कुणालाहि वाटेल. परंतु या अपेक्षेने नाटक वाचणाऱ्या पदरीं निराशा पडेल! वॅ. सावरकर व कै. डॉ. पटवर्धन यांनी पुरस्कारलेल्या भाषाशुद्धीच्या चळवळीचं त्यांत कोलत्यांनी मजेदार विडंबन केलेलं आहे! 'लव्हाळीं'तील त्यांच्या पुष्कळशा कविता विद्यार्थीदशेंतच जन्माला आलेल्या आहेत. अलीकडे मात्र त्यांचा काव्यनिर्झर आटलेला दिसतो!

प्रा. कोलते यांचा प्रांताभिमान मोठा तीव्र आहे! वऱ्हाडी बोलीची अवहेलना ते कधीहि सहन करणार नाहीत! अशा आक्षेपकाला ते आपली बोली कशी शुद्ध व संस्कृताला धरून आहे, तें उदाहरणांसहित ताबडतोब पटवून देतील. विकल्पाने का होईना, पण बहुजनसमाजाच्या बोलींतील रूढ प्रयोगांना विद्वानांकडून मान्यता मिळावी, याच हेतूने अलीकडे ते आपल्या लेखांतून 'मीने' 'तूने' असे प्रयोग अट्टहासाने करीत असतात! त्यांच्या उच्चारानुसारी लेखनपद्धतींतील दृष्टीहि स्पष्टपणें तीच दिसते! मराठींत अडगळींतील सामानाप्रमाणे येऊन बसलेल्या निरर्थक अनुस्वारांचें समर्थन करणाऱ्या सनातनी प्रकृतीच्या विद्वानांचा अर्थात् या गोष्टीला विरोध आहे. तथापि त्यांच्याशी वाद घालीत बसण्यापेक्षा प्रत्यक्ष लेखनांतून निरर्थक अनुस्वारांचें उच्चाटण, भाषेचा स्वाभाविकपणा व उपयुक्तता या दोन्ही दृष्टींनी करणें त्यांना इष्ट वाटतें. 'सोडचिठ्ठी', 'महानुभाव तत्त्वज्ञान', 'गोविंदप्रभुचरित्रा'ची प्रस्तावना-वगैरेंतून त्यांनी सर्व अनुच्चारित अनुस्वारांना अर्धचंद्र दिलेला आहे. 'पिकतं तेथे विकत नाही'-या न्यायाने स्वप्रांतीयांची उपेक्षा झालेली दिसली, तर त्यांना मनस्वी चीड येते! पण यावरून ते संकुचित वृत्तीचे आहेत, असा मात्र समज करून घेणें अगदी चुकीचे ठरेल. परप्रांतीयांचा योग्य गुणगौरव करणें त्यांना मान्य आहे. पण त्यामुळे आपलं स्वत्व विसरून न्यूनगंड बाळगायचा आणि आपल्या औदार्याची विशालता दाखवायची, हें त्यांना बिलकूल पसंत नाही! भाषेच्या बाबतींतहि त्यांचं असंच मत आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा खरी, पण तिने आपल्या मातृभाषेवर आक्रमण मात्र करतां कामा नये!

क्लबचं जिवन त्यांना आवडत नाही. गप्पा मारण्यांत किंवा बैठे खेळ खेळण्यांत संध्याकाळचे २-३ तास घालविण्यापेक्षा पायीं ४ मैलांची रपेट करणं ते मोठ्या आनंदाने पसंत करतील. मात्र सुपारीच्या खांडाचंहि त्यांना व्यसन नाही, असं म्हणण्याची सोय नाही. गप्पा करतांना किंवा कामांत असतांना समोर सुपारीचं भांडं असलं, म्हणजे थोड्या वेळांत तें संपलंच म्हणून समजावं! अभ्यासाच्या बाबतींत ते विशेष चोखंदळ असले, तरी त्यांच्या लिहायच्या मेजाकडे पाहिलं, तर तिथे सारा गोंधळच दिसायचा! माझ्या टापटिपीच्या आवडीमुळे प्रथम प्रथम मी त्यांच्या मेजाच्या साफसफाईकडे लक्ष ठेवीत असे. पण एखादा कागदाचा कपटा दिसेनासा झाला, म्हणजे माझ्या 'व्यवस्थित'पणावरच त्यांचं खापर फुटायचं! कारण हरवलेल्या कपट्यावर बहुतेक कोणतीं तरी महत्त्वाचीं टिपणं असायचीं! मला ही पद्धत माहीत झाल्यापासून मी साफसुफीचा नादच सोडलेला आहे! गंमत अशी की, त्यांना कोऱ्या कागदापेक्षा कॅलेंडर वगैरेंचे पाठकोरे कागद असले

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणजेच लिहिण्याची विशेष स्फूर्ति येते. या गोष्टीचं मला नेहमीच हंसूं येतं! सृष्टिसौंदर्य पाहण्यासाठी भटकण्याची त्यांना अत्यंत आवड आहे. निसर्गरमणीय टेकड्यांवरील उंचसखल मार्गावरून उड्या मारतांना ते आपला वयाचा मोठेपणा केव्हाच विसरून जातात! मात्र एकटेच प्रवासाला गेले, म्हणजे येतांना एखादा कपडा, हजामतीचा ब्रश किंवा साबण अशा प्रकारची एखादी तरी वस्तु हटकून गहाळ झालेली असायची! पोस्टाच्या पेटींत टाकायला नेलेलीं पत्रंहि किती वेळां तरी तशींच परत आलेलीं आहेत!

'लव्हाळीं' वर टीका करतांना अनेक टीकाकारांनी त्यांच्या बुद्धिप्राधान्यावरच विशेष भर दिलेला दिसतो, पण मला वाटतं, बुद्धिप्रधान असण्यापेक्षा ते भावनाप्रधान अधिक आहेत! कोणत्याहि लहानशा प्रसंगाचा त्यांच्या संस्कारक्षम मनावर तावडतोब परिणाम होतो. या त्यांच्या स्वभावामुळे कांहीं काळ विशिष्ट प्रकारचं वाङ्मय त्यांच्या हातून निर्माण होत असलं, तरी केव्हा तरी ते ललित वाङ्मयाकडे वळल्याशिवाय राहणार नाहीत, हें मात्र नक्की. पाहूं या माझी अपेक्षा सफल होते की नाही तें!

• • •

दोन राजर्षि —

१ सयाजीराव गायकवाड

रा. ब. गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.

● सुप्रसिद्ध रियासतकार रा. ब. सरदेसाई यांनीं बडोद्याचे महाराज कै. सयाजीराव गायकवाड व ग्वाल्हेरचे महाराज कै. माधवराव शिंदे यांच्याविषयीं सुंदर परिचय-लेख लिहिले असून त्यांपैकीं सयाजीराव महाराजांवरील लेख आज देण्यांत येत आहे. पुढील अंकीं माधवराव महाराजांवरील लेख देण्यांत येईल, तो प्रस्तुत लेखापेक्षाहि अधिक सरस वाटेल.

रा. ब. सरदेसाई हे सयाजीराव गायकवाड यांच्या पदरीं होते, हें लक्ष्यांत घेतां त्यांच्या या लेखाचें महत्त्व निराळें सांगण्याचें कारण उरत नाही. माधवराव शिंदे यांच्याशींहि त्यांचा प्रत्यक्ष परिचय होता.

* * *

" नर करणी करे तो नरका नारायण होवे " – ही कवीची उक्ति ज्यांनी आधुनिक युगांत आपल्या कृतीने खरी करून दाखविली, त्या सयाजीराव महाराजांचें चरित्र आज तरुण पिढीच्या उपयोगासाठी लिहावयाचें आहे.

नासिक जिल्ह्याच्या एका खेडेगांवांत काशीराव गायकवाड नांवाचे एक सत्वस्थ पाटील राहात असत. दोघां–चौघां बंधूंचा मिळून घरांत कुटुंबविस्तार मोठा होता. पूर्वी यांचे वाडवडील मराठेशाहींत पराक्रम गाजवीत, पण, अलीकडच्या इंग्रजी राज्यांत भाले–तलवारींचें नांगर बनले, त्या योगें घरच्या जमीनतीवर शेती करून व चार गुरें बाळगून प्रपंचाची गुजराण भागविली की, मिळविली, अशांतला यांचा प्रकार बनला. मे महिन्यांत सकाळींच एक पट्टेवाला शिपाई धावऱ्या धावऱ्या दाराशीं येऊन बोलला, " चला पाटील, तुम्हांस कलेक्टर साहेब आताच्या आता बोलावताहेत, ते स्वतः आले आहेत. बाहेर झाडाखालीं घोड्यावरच उभे आहेत. चला, उशीर करूं नका "

पाटलाच्या पोटांत धस्स झालें! कलेक्टर साहेब का बोलावतात? आम्ही काय गुन्हा केला, कोणास

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ठाऊक ! आणि, आता काय अरिष्ट येणार, कळत नाही. 'नाहीं' 'होय,' म्हणण्याची सोय नव्हती. शिपाई तगादा करूं लागला. काशीराव पाटील तसेच डोक्पीस मुंडासें गुंडाळून अंगावर धोतर टाकून साहेबांच्या भेटीस गेले. घरांत लहान-मोठीं मुलें होतीं, तींहि त्यांच्या पाठोपाठ साहेबांचा प्रकार पाहण्यास गेलीं.

पाटलांनी लवून सलाम केला. साहेबांस मोडकें-तोडकें मराठी येत होतें. त्याच धाटणींत त्याने पाटलांस विचारलें, तुम्हांस मुलें किती आहेत, पाटील ! ".

पाटील—" हे बघा, हे माझे तीन मुलगे, थोरला आनंदा, मधला हा गोपाळा आणि हा धाकटा संपती "

साहेब—" आणखी तुमच्या बंधूंना मुलें असतील की नाहींत ? "

पाटील—" आहेत की. कांही हीं इथे जमलीं आहेत, कांही बाहेर गेलीं आहेत. देवाची दया, घरांत दहा-बारा मुलें-मुलीं अशीं मीठ भाकरी खाऊन राहतों ! "

साहेब—"बरें आहे,तुम्ही हे तुमचे तीन मुलगे व तुमच्या बंधूंचे हे दोघे असे पाच बरोबर घेऊन तावडतोब नाशकास या. उद्या सकाळीं नाशकास पोचलें पाहिजे. आमच्या बंगल्यावर हजर व्हा. चुकूं नका, बरें ! "

असें सांगून साहेब तसाच परत गेला. हुकमाप्रमाणें काशीराव मुलांस घेऊन नाशकास गेले. सगळाच घोटाळा ! सरकार का बोलावतात, कांहीच पत्ता लागेना. दुसरे दिवशीं साहेबांच्या बंगल्यावर जातांच एक हपिसर बाहेर आला. त्याने अदबीने मंडळीस नेऊन बंगल्यांत बसविलें. जातांजातांच काशीरावांनीं त्यास विचारलें, " रावसाहेब, आम्हांस कशासाठी येथे आणिलें आहे ? आमच्या हातून कांही गुन्हा झाला आहे की काय ? " त्यावर हॅपिसर म्हणाला, " आत या, बसा, म्हणजे तुम्हांस सगळें सांगतों. " बसल्यावर तो म्हणाला, " बडोद्यास गायकवाडांचें राज्य आहे. मल्हारराव गादीवर होते, त्यांनी आपलें काम बरोबर केलें नाही. म्हणून इंग्रज सरकारने त्यांस राज्य करण्यास अयोग्य ठरवून बडोद्याबाहेर दूर मद्रास येथे नेऊन ठेविलें. मल्हाररावांचे वडील बंधु खंडेराव थोड्या वर्षांपूर्वी वारले, त्यांच्या राणी जमनाबाई आहेत. त्यांस गायकवाडांच्याच कुटुंबातील बारा वर्षें उमरीचा मुलगा दत्तक देऊन राज्य चालवावें, असा सरकारचा ठराव झाला आहे. मुलाची निवड जमनाबाईनी करावयाची आहे. त्यासाठी हीं मुलें घेऊन तुम्हीं तावडतोब बडोद्यास गेलें पाहिजे. "

कोठलें काय नी कोठलें काय ? वरील भाषण काशीरावांस खरें देखील वाटेना. विचार करण्यास:हि वेळ नाही. लगेच साहेब तेथे आले. त्यांनी सांगितलें, " पाटील, हीं मुलें घेऊन तुम्ही बडोद्यास जा. खर्चास लागेल त्यासाठी हजार दोन हजार तुम्हांस जरूर वाटेल ती रकम देतों. विलंब कामाचा नाही ! " झालें. मंडळी नाशकाहून मुंबईस व मुंबईहून तशीच बडोद्यास गेली. ता. २५ मे सन १८७५ रोजीं सकाळीं स्टेशनवर उतरतात, तों त्यांस घेण्यासाठी मंडळी गाडीवर हजर होती. या खेडवळ पाटलांस धड भाषा, बोलणें, पेहेराव सुद्धा माहीत नव्हता ! मग दरबारचे रीत-रिवाज कसे समजणार ! सर्व प्रकार एखाद्या स्वप्नाप्रमाणें अल्पावधींत बनून आला. हत्तीवरून मिरवीत हें गायकवाड कुटुंब मुक्कामावर दाखल झालें.

जमनाबाई महाराणी रुबाबदार, चतुर व उत्साही होत्या. एकंदर पाच मुलें बडोद्यास आणिलीं. पैकी चारचौघांच्या विचारें काशीरावांचे तीनच मुलगे तेवढे महाराणींकडे पसंतीसाठीं नेण्यांत आले. यावेळीं गमतीदार प्रश्नोत्तरें झाली, त्यांचा सारांश असा; वडील मुलगा आनंदराव, वय सुमारें पंधरा, यास महाराणींनी प्रश्न केला, तो असा :

महाराणी–' तुम्ही कशासाठीं येथे आलांत हो ?'

आनंदराव—" मला काय ठाऊक ? सरकारने आणलें, म्हणून आलों "

महाराणी—" आणि, तुम्ही हो गोपाळराव ?"

गोपाळराव—" आम्ही बडोद्याचें राज्य करण्यास आलों ! "

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराणी—" आणि, तुम्ही का आलांत, संपतराव ? "

संपतराव—" आम्हांला खेळायला पाहिजे. इथे खेळ पुष्कळ मिळतील म्हणून आलों ! "

अशीं प्रश्नोत्तरें होऊन जमनाबाई गोपाळरावांवर खूष झाल्या व यांसच पसंत करावें, असा विचार मनाशीं ठरवून दिवाण सर. टी. माधवराव होते त्यांस बोलावून त्यांनी हा आपला अभिप्राय निवेदन केला. त्यांनाहि हाच मुलगा योग्य वाटला. लगेच लाटसाहेबांस तार करून मंजुरी मागण्यांत आली. ता. २७ मे सन १८७५ या दिवशीं यथाविधी दत्तविधान होऊन नांव 'सयाजीराव' ठेवण्यांत आलें. नूतन सयाजीराव राज्यासनावर आरूढ झाले. नशिबाची सद्दी कशी असते पहा. पूर्वायुष्य सर्व खेडेगांवच्या असंस्कृत परिस्थितींत गेलेलें, अक्षरओळख देखील नाही, मग घरांत जन्मटिपणें तरी लिहून ठेवणार कोण ! सयाजीरावांचा नक्की जन्मदिवस व वय कोणासच ठाऊक नव्हतें. बडोद्यास आल्यावर मग जन्मपत्रिका पूजाविधीसाठी अंदाजाने बनविण्यांत आली. ऱ्हस्वाकृतीमुळे यांचे वय बारांहून दोन-एक वर्षें जास्तच असावें, असा तर्क होता. आकाराने ठेंगणे ठुसठुशीत, पण पुढे कसरतीने महाराजांचें शरीर पीळदार व कणखर बनलें. वर्ण निमगोरा, चेहरा खोल व विचारी, दृष्टी अत्यंत भेदक अशी ही असामान्य व्यक्ति, मूळचे पत्रिकेंतले ग्रह कसेही असले, तरी आपल्या कर्तबगारीनेंच ते अनुकूल करून घेणारी बनली आणि नुसत्या बडोद्यांतच नव्हे, तर अखिल हिंदभूमींत व बाह्य भूतलावर देखिल साठ-पासष्ट वर्षांची आपली कारकीर्द त्यांनी स्मरणीय केली. उद्योगाने व परिश्रमाने व्यक्तीची लायकी कशी वाढते, याचें राज्यकर्त्यांत सयाजीरावांच्याइतकें ठळक उदाहरण अलीकडच्या इतिहासांत दुसरें बहुधा मिळणार नाही.

आपल्या या हिंदुस्थानांत स्वराज्याचा अत्यंत ताजा अनुभव फक्त मराठ्यांनीच घेऊन दाखविला. सातारचे छत्रपती किंवा पुण्याचे पेशवे नष्ट झाले तरी बडोदें, इंदूर, कोल्हापूर, ग्वाल्हेर—अशीं राज्यें अद्यापि पूर्वींच्या स्वातंत्र्याची साक्ष पटवीत आहेत. एकोणीसाव्या शतकारंभीं मराठ्यांचें राज्य जाऊन इंग्रजांची सार्वभौम सत्ता देशावर अधिष्ठित झाली. आरंभीं कांही काळपावेतों इंग्रजांना आपलें आसन डळमळीत वाटत होतें. अशा स्थितींत सन १८५७ सालचा प्रक्षोभ निर्माण झाला. तेणेंकरून इंग्रज सरकार व हिंदी जनता या उभयतांना आपापल्या परिस्थितीची जाणीव उत्पन्न होऊन येथील राजकारणांत नवीन मन्वंतर सुरू झालें. त्यांत सरकारने असें आश्वासन जाहीर केलें की, इत्युत्तर देशी राज्यें खालसा न करतां ती औरस वारस नसल्यास दत्तक वारस नेमूनहि पुढे चालविण्यांत येतील. या वचनास अनुसरून बडोद्याच्या मल्हाररावांस पदच्युत केल्यावर तें संस्थान खालसा न करतां सयाजीरावांस दत्तक देऊन राज्य चालविण्याची योजना सरकारने केली. तो प्रकार वर सांगितलाच आहे. अनभ्यस्त लहान मुलगा पसंत करून त्यास आपणास इष्ट असलेलें शिक्षण दिलें, म्हणजे तो कार्यक्षम बनेल, अशी सरकारची अपेक्षा होती, ती सयाजीरावांनी कशी व कितपत पूर्ण करून दाखविली, हें या महाराजांच्या पुढील आयुष्यक्रमावरून कळून येणार आहे.

सन १८७५ पासून स. १९३९ पावेतों चौसष्ट वर्षे अविरत कष्ट करून सयाजीरावांनी एका बाजूस इंग्रजी सत्ता व दुसऱ्या बाजूस हिंदी जनता या उभयतांनाहि अनुकरणीय व परिस्थितीस अनुरूप असा एक नवीन राजकारणी आदर्श मोठ्या सावधगिरीने निर्माण केला. त्यांच्या हयातींतली प्रत्येक बाब स्वकष्टार्जित आहे. एक अशिक्षित बारा-चौदा वर्षांचा खेडवळ मुलगा अचानक ऐश्वर्यशिखरावर येऊन बसला असतां त्याची काय स्थिती व्हावी, अशी आपली कल्पना होईल ? इंग्रज सरकारने आपल्या धोरणास अनुसरून मि. एल्यट नांवाचा एक तरुण आय्.सी.एस्. गृहस्थ सयाजीरावांचा संगोपक म्हणून नेमिला. सुदैवाने तो सच्छील व सद्भावनेचा निघाला. म्हणून महाराजांच्या अंतःकरणांतील निगूढ शक्तींस

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुष्टी मिळत गेली. याबद्दल पुढे त्या गृहस्थावर इंग्रज सरकारची थोडीशी इतराजी सुद्धा झाली. राज्यावर येऊन सहा वर्षे पुरीं होतात न होतात तोंच लॉर्ड रिपनसाहेबांकडून महाराजांनी संस्थानचा राज्यकारभार आपल्या हातीं मागून घेतला. या सहा वर्षांत विद्या ती कितीशी येणार? पहिलें वर्ष तर योजनेंतच गेलें. नंतर मराठी, इंग्रजी, गुजराती व फारसी या चार भाषा, त्यांच्या लिपीचें लेखनवाचन, शिवाय थोडे बहुत हिशेब यापलीकडे जास्त प्रगती काय होणार! कसरत, घोड्यावर बसणें, लष्करी कवाईत, देशी-विदेशी खेळ, शिकार, गोळीबार—अशा अवांतर गोष्टीहि कांही थोड्या शिकायच्या नव्हत्या. वरती राजघराण्यांतले नित्य नैमित्तिक प्रसंग, दसरा-दिवाळी सारखे सण व उत्सव, आप्तेष्टांच्या भेटी-वगैरे केवळ औपचारिक प्रकारहि नित्यक्रमांत महाराजांना सांभाळावे लागत. सारांश, वरील सहा वर्षांत पुस्तकी अभ्यास करण्यास त्यांस विलकूल फुरसत मिळाली नाही. साहेबांच्या सहवासांत मोडकें-तोडकें इंग्रजी त्यांस बोलतां येऊं लागलें, एवढीच त्यांची पहिली कमाई. या कमाईवर त्यांनी आपला पुढील व्याप कसा वाढविला, हें समजून घेण्यांत त्यांच्या जीवनाचें रहस्य आढळतें.

स. १८८१ त अधिकार-धारणाचा समारंभ होऊन दरवार भरला. त्याप्रसंगीं एक-दोन ठळक इशारे त्यांच्या कानावर आले, त्यांनी त्यांच्या अंतःकरणांत कायम वास्तव्य केलें. रिपन साहेबांनी पाठविलेला खलिता दरबारांत मुंबईच्या गव्हर्नरांनी वाचून दाखविला. तसेंच, पुण्याच्या सार्वजनिक सभेनें महाराष्ट्राच्या आकांक्षा व्यक्त करणारें एक मार्मिक मानपत्र पाठवून दिलेलें वाचण्यांत आलें. हें मानपत्र कै. माधवराव रानडे यांनी तयार केलेलें होतें, ही गोष्ट मशहूर आहे. राज्यकारभार व्यवस्थित न चालल्यास काय परिणाम होतो, हें मल्हाररावांच्या उदाहरणावरून महाराजांस प्रथमपासूनच अवगत होतें. त्यांत सार्वभौम सरकारशीं राजनिष्ठ राहण्याचा संदेश आणखी त्यांस मिळाला. मिळून अधिकार हातीं येतांना आपल्यावर केवढी जबाबदारी येऊन पडली आहे, याची जाणीव महाराजांच्या अंतःकरणांत त्यावेळीं कायम ठसली. अशा परिस्थितींत प्रथम पासून, "ऐकावें जनाचें करावें मनाचें," असा कर्तव्य-मार्ग त्यांनी आपल्या दृष्टीपुढे निश्चित केला. त्यावेळीं कित्येक मोठे नामांकित गृहस्थ राज्यांत अधिकारावर होते. राजा सर टी. माधवराव दिवाण, काजी शहाबुद्दीन,' विनायकराव कीर्तने, मणिभाई जसभाई, अंबालाल साकरलाल असे अनेक विद्वान् प्रतिष्ठित गृहस्थ निरनिराळ्या खात्यांचें काम पाहत होते. कोणतेंहि प्रकरण महाराजांकडे रुजू होतांना अशा एक किंवा अनेक विद्वान् कर्तबगार अधिकाऱ्यांशीं महाराजांचा प्रत्यक्ष संबंध येऊं लागला. त्यांच्यांशीं पूर्ण चर्चा करून मग आपलें मत बनविण्याचा प्रघात महाराजांनी सुरवातीपासून ठेविल्यामुळे दररोज पाच-चार तास तरी त्यांचें अशा विद्वानांच्या सान्निध्यांत जाऊं लागले. शाळा-कॉलेजचा अभ्यासक्रम त्यांस लाभला नव्हता, त्याची उणीव या मंडळीच्या शिकवणीने व प्रत्यक्ष वादविवादाने त्यांनी आपण होऊन भरून काढली. अर्थात् कॉलेजांतील व्याख्यानांपेक्षा अशांचा सहवास त्यांस जास्त फलप्रद झाला. त्यांची दृष्टि मार्मिक बनली, बहुश्रुतपणा वाढला, आपला शह दुसऱ्यावर बसवण्याची हातोटी त्यांस साधत गेली. शिवाय कोणी विद्वान् अगर कला-हुन्नर जाणणारे गृहस्थ बाहेरून बडोद्यांत आले, तर त्यांच्याहि भेटी स्वस्थपणें घेऊन आपल्या ज्ञानसंवर्धनाची संधि महाराजांनी कधीहि वाया जाऊं दिली नाही. अनेक तज्ज्ञांचीं व्याख्यानेंहि ते मुद्दाम आपल्यासमोर करवीत.

आरंभीच्या काळांत वरील जुन्या मंडळीचें एक प्रकारचें वडीलकीचे दडपण महाराजांवर होतें, तें दहा-पंधरा वर्षांत नाहीसें होऊन पुढे उत्तरोत्तर त्यांचें स्वतंत्र तेज चमकूं लागले. मात्र आपल्या पदरीं ते विद्वान् व कल्पक माणसांचा संग्रह अखेरपावेतों करीत गेले. लोकमान्य टिळक ज्यांना गुरुस्थानीं मानीत ते बापूसाहेब आठल्ये, त्यानंतर अरविंद घोष, श्रीनिवास राघव ऐयंगार, रमेशचंद्र दत्त, व्ही. पी. माधवराव, आब्बास तय्यबजी व अलीकडचे दिवाण कृष्णमाचारी अशा अनेक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

थोर व नामांकित गृहस्थांस परिश्रमपूर्वक जवळ आणून त्यांचा उपयोग महाराजांनी मोठ्या योजकतेने आपल्या कार्याकडे करून घेतला. त्यांस इमारतींचा शोक विशेष होता. म्हणून आलटून-पालटून कित्येक नांवाजलेले कल्पक इंजिनियर्सहि त्यांनी जवळ ठेविले. अशा नानाविध कर्तबगारीचा लाभ महाराजांना व त्यांच्या प्रजाजनांना तर झालाच, पण त्या योगें खुद्द त्यांची योग्यताहि वृद्धि पावली. माधवराव रानड्यांस त्यांनी दिवाणगिरीसाठी बोलाविलें होते, हें कित्येकांस ठाऊक असेल. मात्र रानड्यांनी आपलें वयोमान व स्वीकृत उद्योग लक्ष्यांत घेऊन महाराजांची विनंति मान्य न करितां तत्संबंधी एक मासलेवाईक उत्तर लिहून पाठविलें, तें महाराष्ट्रांत कित्येकांच्या परिचयाचे आहे.

इंग्रजांच्या अनुकरणाने संस्थानांच्या कारभाराची एक प्रथाच पडून गेली आहे की, शालागृहें, रुग्णोपचार-गृहें, गुन्ह्यांचे न्यायनिवाडे, सडका, इमारती, आयव्यय अशा मामुली बाबींचा वृत्तांत सरकारच्या देखाव्यांत आणला की, राजाचें कर्तव्य भागलें, ज्याने त्याने आपल्या पुरतें पहावें, समस्त राष्ट्राची किंवा एकंदर हिंदी जनतेची पर्वा कोणी ठेवायची नाही हा आकुंचित् दृष्टीचा प्रकार सयाजीरावांस मानवला नाही. या गोष्टी साधतांना बाह्य जगाच्या प्रगतीकडे त्यांची नजर सदा फिरत राहिल्यामुळे त्यांचा एकंदर कारभार व्यापक राष्ट्रीय स्वरूपाचा बनला. सार्वभौम सरकारास महाराजांबद्दल वैषम्य वाटे तें यामुळे. प्रवासाची आवड व चौकस जिज्ञासु वृति या गुणांनी इतर संस्थानिकांशीं तुलना केल्यास सयाजीरावांच्या एकंदर उद्योगास निराळें वळण कसें प्राप्त झालें, हें प्रामुख्याने नजरेस येतें.

हिंदुस्थानचा प्रवास तर त्यांनी बारकाईने केलाच, पण युरोप–अमेरिकेपर्यंत अनेकदा जाऊन त्यांनी पाश्चिमात्यांचे उद्योग बारकाईने तपासून पाहिले. जर्मनीचा कैसर, फ्रेंच व अमेरिकन राष्ट्रांचे सभापती, तसेच, ठिकठिकाणचे विद्वान् व नामांकित पुढारी अशांच्या गाठी घेऊन त्यांच्याशीं विचारविनिमय केला. अमेरिकेंत सर्व धर्मांची परिषद् भरली, तिचे तर ते अध्यक्षच होते. साम्राज्यवादी इंग्रज राज्यकर्त्यांस महाराजांचें हें धोरण मानवलें नाही. त्यांना वाटे, या बाह्य उठाठेवी महाराजांना कशाला पाहिजेत? लॉर्ड कर्झनशीं त्यांचें लेखयुद्ध सारखें चालू राहिलें! सन १९११ सालच्या दिल्ली–दरबार–प्रसंगीं महाराजांच्या वर्तनाचा जो निष्कारण बोभाटा झाला, तोहि अशा विरोधी पक्षाच्या कटाचा एक नमुनाच होय! देशभक्त दादाभाई नवरोजी यांना शेवटीं वृद्धावस्थेंत आर्थिक विपत्ति प्राप्त झाली, हें कळतांच महाराजांनी त्यांस कायम वेतन बांधून देऊन त्यांचा परामर्श घेतला. अशा कारणांनी महाराजांचें राष्ट्र–प्रेम व्यक्त होऊन त्यांजवर लोकांची श्रद्धा विशेष बसली.

सारांश, **केल्याने देशाटन, पंडित-मैत्री, सभेंत संचार। शास्त्र-ग्रंथ-विलोकन मनुजा चातुर्य येतसे फार॥**–ही नीति आधुनिक युगांत जर कोणी प्रत्यक्ष आचरून दाखविली असेल, तर ती सयाजीरावांनीच् होय. या दृष्टीने ते हिंदी जनतेला धुरीण राष्ट्र–पुरुष वाटू लागले. अलीकडे लंडनांत गोलमेज परिषदा भरून हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेची चर्चा झाली, तींत मध्यवर्ती संयुक्त-मंडळांत संस्थानिकांनी प्रवेश करावा की नाही, असा प्रश्न उद्भवला, तेव्हा सयाजीराव लंडनांत होते. त्यांनी संस्थानिकांची खाजगी बैठक भरवून कळकळीचा सल्ला दिला की, सर्वांनी या फेडरेशन-मध्ये अवश्य सामील व्हावें, त्यांतून फुटून अलग राहण्याने हिंदी राष्ट्राच्या ऐक्यास अपाय होईल. महाराजांनी आपल्या राज्यांत कैक वर्षांपूर्वी हिंदी भाषेचा प्रचार चालू केला होता, त्याचेंहि प्रयोजन हेंच होय. समस्त भारतभूमीचें एकमुखी राष्ट्र बनून त्याला भूतलावर इतर राष्ट्रांच्या बरोबरीचा मान प्राप्त व्हावा, हें उच्च ध्येय त्यांनी आपल्या दृष्टीपुढे सदैव वागविलें. इंग्रज बादशाहीच्या ताबेदारींतील सवता सुभा त्यांनी कधी मान्य केला नाही. यासंबंधांत सार्वभौम सरकारच्या गैरमर्जीची क्षिति त्यांनी बाळगिली नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सयाजीरावांचा प्रत्येक गुण प्रौढपणांतील आत्यंतिक कष्टानें संपादिलेला होता. मराठी भाषेचें व्याकरण, अंकगणित, संस्कृत, तुकाराम-रामदासांचे ग्रंथ–असे किती तरी विषय, काश्मीर, स्वित्झरलंड अशा ठिकाणींदेखील प्रस्तुत लेखकानें त्यांस समजावून दिलेले आहेत! कोणास खरें देखील वाटणार नाही की, सभेंत भाषण करतांना आपलें कांही व्यंग दिसूं नये, आवाज, उच्चार, हावभाव इत्यादि संबंधांत आपणास कोणी नांवें ठेवूं नयेत म्हणून सभेच्या दूरच्या कोपऱ्यांतून आपल्या भाषणाचें निरीक्षण करणारे हस्तक ते टेवीत, आणि दाखविलेले दोष प्रयत्नपूर्वक दूर करीत. आपलें भाषण तयार करणें व तें पुनः पुन्हा वाचून ध्यानांत ठेवणें, याबद्दल ते विशेष काळजी घेत. म्हणूनच उत्तम वक्ते म्हणून अंतीं त्यांची ख्याति होऊन जनतेवर त्यांची छाप बसली. त्यांच्या भाषणांचा संग्रह छापलेला असून वाचनीय आहे.

सयाजीरावांचें एकंदर आयुष्य कष्टांत गेलें. पूर्वार्धभागांत त्यांचा स्वभाव आनंदी, खेळाडू वृत्तीचा होता, तो उत्तरोत्तर बदलत जाऊन त्यांस उद्वेग, निराशा, नीरसता प्राप्त झाली! प्रापंचिक दुःखांनी त्यांना ग्रासलें. तीन मोठे सुबुध्द पुत्र, बंधू व इतर आत्मीय मंडळी त्यांच्या देखत कालवश झाल्यानें त्यांना आपलें जिणें अत्यंत रूक्ष वाटूं लागलें! संधिवातानें प्रकृति खालावत गेली. युरोपांतल्या कोणत्या तरी एकान्त स्थळीं राहून ते कालक्रमणा करूं लागले. समाजाचा कंटाळा आला! मात्र कोठेहि असले, तरी त्यांचा नित्याचा रेखीव कार्यक्रम कधी थांबला नाही!

जवळ जवळ तीन पिढ्या त्यांनी पाहिल्या. वय ८० च्या घरांत येऊं लागलें. सहधर्मचारिणी चिमणाबाई महाराणी सदैव पतिसेवेंत निमग्न असत. स. १९३८ च्या ऑक्टोबरअखेर महाराज युरोपांतून मुंबईस दाखल झाले, आणि आपल्या जयमहाल बंगल्यावर गेले. त्याच दिवशीं एकदम प्रकृति बिघडली! महाराणी मागे लंडनास होत्या; त्यांस तारेनें खबर मिळून लगेच त्या विमानमार्गें धावत आल्या. महाराजांनी बडोद्यास जाण्याचा ध्यास घेतला. पण प्रकृति प्रवास करण्याइतकी सुधारल्याशिवाय बडोद्यास जातां येईना. तीन महिने औषधोपचार चालले, पण गुण नाही. दिवसेंदिवस प्रकृति बिघडतच गेली; आणि मंगळवार ता. ६ फेब्रुवारी स. १९३९ या दिवशीं रात्रीं ८ वाजतां कृतकृत्यतेच्या भावनेंत त्यांचें देहावसान झालें! लगेच त्यांचें शव स्वतंत्र गाडीनें बडोद्यास नेण्यांत आलें. त्या संबंधांत सर्व पुढाकार स्वतः चिमणाबाईंनी घेऊन पतीच्या अंत्यसेवेचें पुण्य संपादिलें. लक्ष्मीविलास राजवाड्यांत दुसऱ्या दिवशीं महाराजांचें शव सर्व जनतेच्या दर्शनार्थ ठेवून चिमणाबाई जवळ बसल्या. नागरिकांनी येऊन मोकळेपणी दर्शन घेतलें. नंतर चिमणाबाईंनी स्वहस्तानें स्नान घालून प्रेतशृंगार केला. अंत्यस्वारीची सिद्धता झाल्यावर सकाळीं दहा वाजतां यात्रा चालूं लागली. ज्या रस्त्यांनी ज्या ऐश्वर्यानें साठ वर्षें पावेतों गजारोहण करून सयाजीरावांनी वारंवार भव्य मिरवणुकी अनुभविल्या, त्याच रस्त्यांनी त्याच ऐश्वर्यानें या अंत्य प्रसंगीं शिबिकाशयन करून प्रचंड व स्तब्ध जनसंमर्दांतून महाराज अंत्यस्थळास पोंचले! त्याप्रसंगी समस्तांच्या नेत्रांतून कसे अश्रुप्रवाह निघाले असतील, याची कल्पनाच करावी. संतांनी शिकविलेली मानवी जीवनाची अनुभवोक्ति सयाजीरावांनीच खरी करून दाखविली. ती ही की, ' जब तुम आये जगतमें जन हासें, तुम रोय। अब करणी ऐसी करो, तुम हासे जन रोय ॥ '

तात्पर्य, हेंच की, एकोणीस–वीस शतकांतील हिंदी राजकारणाचा जीवंत इतिहास सयाजीरावांच्या चरित्रांत स्पष्ट प्रतीत होते.

• • •

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मयाचें मूल्यमापन
(लेखांक २ रा)

प्रा. अच्युत नारायण देशपांडे, एम्. ए.

● प्रा. देशपांडे यांच्या प्रस्तुत लेखमालेचा हा दुसरा लेखांक होय. यांत त्यांनी 'जीर्ण प्रवृत्तींचा परामर्ष' अधिक विस्ताराने व जोरदार भाषेंत घेतलेला आहे.

● प्रा. देशपांडे यांची ही लेखमाला साहित्याचे व साहित्यशास्त्राचे अभ्यासक यांस कुतूहल-जनक वाटेल अशी आशा आहे.

* * *

जीर्ण प्रवृत्तींचा परामर्ष
२

साहित्यशास्त्रक्षेत्रांतील ॲरिस्टॉटल-मम्मट प्रभृति मनूंनी प्रतिपादिलेल्या विधिनिषेधांचें स्तोम माजविण्याच्या प्रवृत्तीशींच अगदीं संलग्न अशी वाङ्मयाच्या पूर्वग्रहनिरपेक्ष व न्याय्य रसास्वादाच्या दृष्टीने अनिष्ट असलेली आणखी एक प्रवृत्ति आहे; आणि, ती म्हणजे वाङ्मयाचे कांहीं ठराविक, कृत्रिम, पाणीबंद-प्रकार पाडून आणि प्रत्येक 'प्रकाराचीं कांहीं ठराविक लक्षणें कल्पून प्रत्येक वाङ्मयीन कृतीचें, ती कोणत्या प्रकारांत बसते हें पाहून, तिचें काटेकोर परीक्षण करणें ही होय !

पहिल्या प्रवृत्तीप्रमाणेंच, याहि प्रवृत्तीला फार जुनी अशा ऐतिहासिक परंपरा आहे. ती पश्चिमेकडे आहे आणि पूर्वेकडेहि आहे. ही प्रवृत्ति पुरातन आणि परंपरागत असल्यामुळे मनुष्यस्वभावधर्मानुसार, सामान्यपणें सर्व साहित्यचर्चाप्रेमी जनतेला अनेक वर्षांपासून प्रिय आणि पूज्य वाटत आलेली आहे. पाश्चिमात्य साहित्यशास्त्राचा आद्य प्रणेता जो ॲरिस्टॉटल त्याच्याहि पूर्वीपासून या प्रवृत्तीने मूळ धरलेलें आढळून येतें. ॲरिस्टॉटलचा गुरु जो प्लेटो त्याने कवितेचे (१) Dithyrambs म्हणजे आत्मनिष्ठ कविता, (२) Imitative म्हणजे परकाया-प्रवेशात्मक नाट्यमय कविता व (३) Epic म्हणजे जींत कांहीं अंश आत्मनिवेदनाचा असतो आणि कांहीं अंश अनुकृतीचा असतो, अशी महाकाव्यासारखी कविता असे तीन प्रकार केलेले आढळतात. ॲरिस्टॉटल तर आपल्या काव्यशास्त्रीय विवेचनाला प्रारंभ करतांनाच कांहीं विशिष्ट वाङ्मय-प्रकार गृहीत धरून चाललेला दिसतो. त्याच्या प्रसिद्ध 'Poetics' चें पहिलेंच वाक्य मुळीं असें आहे : "I propose to treat of Poetry in itself and of its various kinds, noting the essental quality of each," आणि, ग्रंथाच्या दुसऱ्याच छेदकाच्या पहिल्याच वाक्यांत " Epic poetry and Tragedy, Comedy also and Dithyrambic poetry "— हें त्याला मान्य असलेलें वर्गीकरण अगदीं स्पष्टपणें सांगून टाकलें आहे. तरी पण एकंदर 'Poetics' वरून सर्व काव्य एक आहे, अशी त्याची काव्यासंबंधी बरीच व्यापक आणि गतिशील दृष्टि असावी, असें वाटते. ॲरिस्टॉटल-नंतर मात्र खि. पू. ३ ऱ्या व २ ऱ्या शतकांत वाङ्मयाकडे पाहण्याची टीकाकारांची दृष्टि अत्यंत संकुचित आणि स्थितिशील बनली. ॲरिस्टॉटलने केलेलें वाङ्मयवर्गीकरण अगदी अबाधित स्वरूपाचें आहे आणि प्रत्येक वाङ्मयप्रकाराचें तंत्र पक्कें ठरलेलें असून तें अनुल्लंघनीय आहे, ही प्रतिगामी कल्पना दृढमूल होऊन बसली. परिणाम असा झाला की, वाङ्मयांत तांत्रिकतेचें विलक्षण प्रस्थ माजलें. पुढे पुढे तर या तांत्रिकतेचें फारच लाड होऊं लागले ! त्यामुळे कॅलिमॅकस इतका चिडून गेला, की होमरच्या काव्याचें अगदी हुबेहुब, तांत्रिकदृष्ट्या काटेकोर, अंधानुकरण करण्याऱ्या तंत्रवादी कवींचा त्याने खडसून निषेध केला आणि अशा अनुकरणात्मक कवितां-- Cyclic poems- बद्दल आपली

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

तीव्र नापसती व्यक्त करून दाखविला. त्यानें स्वच्छ सांगून टाकलें: " I hate this cyclic poem the common road which every one uses."

कॅलिमॅकससारखे मौलिक प्रतिभेचे पक्षपाती साहित्यशास्त्रज्ञ कितीहि निघाले, तरी परंपरेचा पगडा बसायचा तो बसतोच आणि कायमहि राहतो. पुढे, खिस्तोत्तर पहिल्या शतकांत तांत्रिकतेचा आणि ठराविक कृत्रिम वाङ्मयप्रकारांचा अभिनिवेशाने व हिरीरीनें पुरस्कार करणारा रोमन टीकाकार होरेस निघालाच! आणि, आज सुद्धा किती तरी पाश्चिमात्य साहित्यशास्त्रकार अॅरिस्टॉटल-प्रणीत वाङ्मयवर्गीकरणाला, कधी प्रत्यक्षपणें तर कधी अप्रत्यक्षपणें संमति देऊन त्याप्रमाणे वाङ्मयतत्त्वविवेचन करीत असलेले आढळून येतात.

संस्कृत साहित्यशास्त्रांतसुद्धा जवळ जवळ तोच प्रकार आढळून येतो. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी सर्व वाङ्मयप्रकारांचा 'काव्य' या व्यापक व योग्य संज्ञेत समावेश केलेला असला, तरी सुद्धा त्यांना 'उत्तम, मध्यम, कनिष्ठ' हें गुणानिष्ठ, 'अविवक्षितवाच्य, विवक्षितान्यपरवाच्य' हें रीतिनिष्ठ, तसेंच, 'निबध्द, अनिबद्ध' हें बाह्यांगनिष्ठ असें निरनिराळ्या भूमिकांवरून केलेलें काव्याचें वर्गीकरण मान्य असलेलें स्पष्टच दिसून येतें. केवळ नाट्यवाङ्मयच घेतलें, तरी त्याचें नाट्यशास्त्रांत नाटक, प्रकरण, अंक, व्यायोग, भाण, समवकार, वीथी, प्रहसन, डिम, ईहामृग–हे निश्चित दहा प्रकार निश्चित लक्षणांसह पाडलेले दिसतात!

त्याचप्रमाणे, संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी रसांची जी सुरवातीला आठ व नंतर नऊ (शांतरसाचा समावेश केल्यानंतर) अशी निश्चित संख्या गृहीत धरलेली दिसते, ती म्हणजे काव्यांत कवीच्या ज्या उत्कट मनोभावांचा आविष्कार झालेला असतो, त्या मनोभावांचें केलेलें कृत्रिम वर्गीकरणच होय! विशेष समाधानाची गोष्ट ही की, संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी रससंख्यानिर्णयाच्या बाबतींत अत्यंत परिवर्तनशील, उदार आणि व्यापक भूमिका घेतलेली आढळते. अशा भूमिकेचा प्रत्यय आपणांस लोल्लट व रुद्रट यांच्या विवेचनांत येतो. 'सर्वच भाव रसरूप होऊं शकतात, व्यभिचारी भावसुद्धा चांगला परिपुष्ट झाला, तर तोहि रसपदवीप्रत पोहोचूं शकतो' – अशा तऱ्हेची बंडखोर विचारसरणी या स्वतंत्रवृत्तीच्या विवेचकांनी मांडून आठ स्थायीभाव व तेहतीस व्यभिचारी भाव हें वर्गीकरण कसें अनवश्यक आणि अयथार्थ आहे, हें पटवून दिलें. आपल्या मराठींत सुद्धा सर्व आस्वाद्य भावनांची सोय रूढ रससंख्येंत होत नसल्यामुळे सारीच रसव्यवस्था अपूर्ण आणि अशास्त्रीय आणि म्हणून व्यर्थ आहे, अशा तऱ्हेचा योग्य आरोप कै. माधवराव पटवर्धनांनी केला होता; पण लोल्लट रुद्रट या प्राचीनांनी किंवा पटवर्धनांसारख्या अर्वाचीनांनी स्वीकारलेल्या या रास्त विवेचनपद्धतींतील रहस्याची आणि औचित्याची योग्य ती बूज आजसुद्धा राखलेली दिसून येत नाहीं. आजहि स्वभावतःच पंगू असलेल्या रसवर्गीकरणाचें, लंगडे युक्तिवाद करून, समर्थन करण्याचा पद्धतशीर प्रयत्न होत आहे, आणि नऊ या रससंख्येचें अबाधित्व, पाश्चिमात्यांच्या मानसशास्त्रविषयक विचारांचा आश्रय घेऊन सिद्ध करण्याचा अप्रस्तुत व्यापारहि कांहीं मराठी साहित्यशास्त्रज्ञांकडून मधून मधून होत आहे!

एवढी भक्कम ऐतिहासिक प्रतिष्ठा लाभलेली ही, वाङ्मयाचे विशिष्ट प्रकार पाडून वर्गीकरण करण्याची पद्धति, तिच्या अंगभूत दोषामुळेच त्याज्य आहे, असें आम्हास वाटतें. शेक्सपीअरच्या शोकान्तिकेंतील नायकाप्रमाणे, तिच्या अंगभूत दोषांतच तिच्या विनाशाचीं बीजें साठविलेलीं आहेत. गुणनिष्ठ वा रीतिनिष्ठ वा रसनिष्ठ वा बाह्यांगनिष्ठ —यांपैकी कोणतीहि वर्गीकरणपद्धति आपण घेतली, तर तिला कोणत्याहि काळीं स्थैर्य आलेलें दिसून येत नाही. निरनिराळ्या काळांतल्या साहित्यकारांनी आणि साहित्यशास्त्र्यांनी, कोणत्याहि भूमिकेवरून केलेल्या वर्गीकरणाच्या बाबतींत, कधी रूढ वाङ्मयप्रकाराविषयीं नापसंती दाखविली आहे, कधी त्या प्रकारांत संकोच सुचविला आहे, तर कधी त्यांत घालावयाच्या नवीन प्रकारांची शिफारस केलेली

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. आपण स्पष्टीकरणार्थ मराठी पुरतेंच बाह्यांगनिष्ठ वर्गीकरणाचें उदाहरण घेऊं. ओवी, अभंग, दिंडी, पद, आर्या, गीति, अक्षरगणवृत्तें, जाती, सुनीत, गझल, कणिका, मुक्तछंद अशा निरनिराळ्या प्रकारच्या बाह्यांगांत मराठी कविता आजपर्यंत प्रकट झाली आहे. यांपैकी कोणत्याहि एका प्रकारावर ती कधीच कायमची स्थिर झाली नाहीं. यांतच तिचें आणि पर्यायानें साऱ्या जिवंत, अस्सल वाङ्मयाचें वैशिष्ट्य आहे! स्वतंत्र प्रतिभेचे जे कवि असतात, ते त्यांना प्रतीत झालेल्या विशिष्ट जीवनविषयक अनुभूतीला तिच्या उठावदार व सर्वांगीण आविष्काराला योग्य अशा स्वरूपांतच व्यक्त करतात; कोणत्याहि ठरीव वाङ्मयप्रकाराच्या निर्जीव, रूढ तंत्राच्या साच्यांत आपल्या अनुभूतीला बळजबरीनें डांबण्याचे निरर्थक श्रम ते कधीच घेत नाहीत. सामान्य प्रतीचे, परप्रत्ययनेयबुद्धि असे जे कवी असतात, ते मात्र या स्वतंत्र प्रतिभेच्या कवींच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांच्या काव्याचें बाह्यांग म्हणजे व्यक्तीकरणाची आदर्शपद्धति अशी कल्पना करून त्या बाह्यांगाच्या गणमात्रा पाडून, त्या जुळविण्याचें शास्त्र बनवून, त्या शास्त्रपुनीत बाह्यांगांत कसेबसे आपल्या जीवनानुभूतीला कोंबून, ट-ला ट जमवीत रटाळ पद्यरचनेचा उपद्व्याप करीत असतात! आधुनिक मराठी काव्याच्या कालखंडांत ज्यांनी प्रामुख्यानें जुनींपुराणीं वृत्तादिकांचीं बंधनें झुगारून दिलीं व जीवनानुभूतीच्या प्रामाणिक व उत्कट आविष्काराची भूमिका बव्हंशीं सोडली नाही, अशा कवींत मला प्रामुख्यानें केशवसुत व अनिल यांचा उल्लेख करावासा वाटतो. केशवसुतांनी कांही थोड्या कविता जुन्या वृत्तादिकांत केल्या; पण त्यांच्या काव्याचें खरें सामर्थ्य आणि सौंदर्य त्यांनी कांहींशा स्वैर, अनिर्बंध शैलींत लिहिलेल्या 'तुतारी' 'हरपलें श्रेय' 'सतारीचे बोल' याच कवितांत दिसून येतें. रा. आत्माराम रावजींची बहुतांश काव्यनिर्मिती मुक्तछंदांतच झालेली आहे. खरें पाहिलें असतां त्यांना प्रतीत झालेलें जीवन-विषयक सत्य काव्यरूपानें बाहेर पडतांना मुक्तछंदाच्या स्वाभाविक बाह्यांगासहित बाहेर पडलें असें म्हटलें पाहिजे. छंदस्त्व हा कवितेचा सहजसिद्ध, अंगभूत गुणधर्म असल्यामुळ मुक्तछंदाचें वैशिष्ट्य अर्थातच त्याच्या मुक्तपणांतच उरलें; पण मुक्तछंदाचें हें मुक्तत्व पाहून आमच्या साहित्यशास्त्रज्ञांना कसचें स्वस्थ बसवतें? त्यांनी त्याच्या मात्रावेलांच्या मोजायला सुरवात केली आणि रा. वामन नारायण देशपांडे यांच्याकडून त्याचें नियमबद्ध शास्त्र बनविण्यांत[1] आलें. मराठींतील जुने वारकरी संतकवि मात्र खरे जातिवंत कवीच म्हटले पाहिजेत. त्यांनी आपल्या भक्तिभावनेला व्यक्त करण्याकरितां ओवी, अभंग हे कांहीसे रूढ, बाह्यांगनिष्ठ वाङ्मयप्रकार उचलले, पण त्यांच्या बंधनांनी त्यांनी स्वतःला कधीच जखडून घेतलें नाही! एवढेंच काय, पण या प्रकारांना कांही बंधनें असतात, याचीहि फारशी दाद घेतली नाही. प्रत्येक कवि आपल्या भक्तिभावनेच्या सर्वांगीण आविष्काराच्या सोयीच्या दृष्टीने ओवीच्या, अभंगाच्या प्रत्येक पदांतील अक्षरसंख्येंत अजाणतां इष्ट तो बदल करूं लागला! खरोखरच संतकवींची ही काव्याकडे पाहण्याची पुरोगामी दृष्टि पाहून सहजच मनांत विचार येतो कीं, काव्याच्या खऱ्या मूलतत्त्वांवर

---

१. रा. आ. रा. देशपांडे ऊर्फ आनिल यांच्या मुक्तछंदाचें 'नियमबद्ध शास्त्र' बनविण्याचें श्रेय प्रा. अ. ना. देशपांडे मजकडे देतात, पण तें मी स्वीकारूं शकत नाही! कारण ज्या आ. रा. देशपांड्यांनी आपला मुक्तछंद बनविला, त्यांनीच त्याचें नियमनहि केलेलें आहे! किंबहुना, मुक्तछंदाची चर्चा प्रथम त्यांनीच सुरू केली! अर्थात् त्यांच्या मुक्तछंदाच्या 'मात्रावेलांच्या'-वगैरे मोजून त्याचें 'नियमबद्ध शास्त्र' बनविण्याचें श्रेय सर्वस्वीं त्यांजकडेच जाते!

इतर अभ्यासकांची अशीच रास्त समजूत असलेली दिसते. प्रा. रा. श्री. जोग 'केशवसुत' पुस्तकांत लिहितात, "मुक्तछंदाचें स्वागत नीट होत नाही, असें दिसतांच कवि अनिल यांनी त्याविषयीं चर्चा केलीच ना?" (पा. २७४).

—वा. ना. देशपांडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सदैव आपली दृष्टि (बहुधा अभावितपणें) केंद्रित ठेवणारे ते जातिवंत संतकवि कोठे आणि ओवीच्या-अभंगाच्या पदांतील मात्रांचें परिगणन करून त्यांना नियमबद्ध करून टाकण्यास धडपडणारे आजचे तंत्रवादी पंडित कोठे !

तेव्हा तात्पर्य काय की, खऱ्या कवीच्या काव्याचें बाह्यांग कोणत्याच ठराविक वाङ्मयप्रकाराच्या साच्यांत कधीच बसलेलें आढळत नाही. जी गोष्ट बाह्यांगनिष्ठ वर्गीकरणाची तीच इतर सर्व तऱ्हेच्या वर्गीकरणाला लागू पडते. वर्गीकरणपद्धति ही अशी निकामी आणि सर्वस्वी अप्रस्तुत आहे. तिचा खऱ्या वाङ्मयाच्या सर्जनप्रक्रियेशीं कांहीच संबंध नाही; तिचें स्वरूप अत्यंत चंचल, क्षणभंगुर आणि ' जितके कवी तितक्या रीती '–असें सदैव बदलणारें आहे; तिला अबाधित सिद्धान्ताचें स्थान देणें हें पाऱ्याला चिमटींत धरूं पाहण्यासारखें अप्रयोजकपणाचेंच नाही का ?

वाङ्मयवर्गीकरणाचें वैफल्य आणखीहि एका दृष्टीने सहज पटण्यासारखें आहे. अशी एक तरी वाङ्मयीन कलाकृति सापडेल का की, जिच्यांत एखाद्या विशिष्ट वाङ्मयप्रकाराचे एकूणएक सारे नियम तंतोतंत पाळलेले आहेत ? पुष्कळ वेळेला तर आपल्याला असा अनुभव यतो की, जिला आपण थोर वाङ्मयीन कलाकृति समजतों, तिच्यांतील लौकिक अर्थाने ज्या वाङ्मयप्रकारांत मोडते–त्या प्रकाराच्या मान्य बंधनाकडे बरेंच दुर्लक्ष झालेलें आहे आणि तिचें थोरपण तिच्या तंत्रशुद्धतेंत नसून तिच्यांतून आविष्कृत केलेल्या उत्कट जीवनानुभूतींत साठवलें आहे.

बरें, वर्गीकरणपद्धतीनुसार पाडलेल्या कोणत्याहि विशिष्ट वाङ्मयप्रकाराचें तंत्र तरी अगदी रेखीव व ठाम असतें, असें म्हणावें, तर तसेंहि आढळत नाही ! कादंबरी हाच प्रकार घ्या/ना. त्याच्या बाबतींत तर व्याख्या करण्यापासूनच अडचण उद्भवलेली आहे. या वाङ्मयप्रकाराचा विशेष साक्षेपाने अभ्यास करणाऱ्या E. M Forster ला सुद्धा 'A fiction in prose of a certain extent' अशी त्याची अगदीच स्वैर आणि कामचलाऊ व्याख्या बनवावी लागली. ' कलेच्या इतर प्रकारांच्या बाबतींत निश्चित तत्त्व–तंत्र योजना आखतां येईल, पण कादंबरीच्या बाबतींत मात्र तें शक्य नाही. ' (' Principles and systems may suit other forms of art, but they cannot be applicable here '), असेंहि त्याला साफ सांगून टाकावें लागलें ! त्यामानाने या वाङ्मयप्रकाराच्या बाबतींत फील्डिंग या पहिल्याच इंग्रजी कादंबरीकाराने घेतलेली भूमिका बरीच पुरोगामी आणि तंत्रनिरपेक्ष होती, असें म्हणावें लागतें. त्याने मुळी स्पष्टच लिहिलें की, " लेखनाच्या या नवीन प्रकाराचा मीच जनक आहे; तेव्हा मला वाटेल तसें मी त्याचें तंत्र बनवीन. " (' As I am, in reality, the founder of a new province of writing, so I am at liberty to make what laws I please therein. ')

काटेकोर वर्गीकरणाच्या मागे लागलेल्या साहित्यशास्त्रकारांची कशी त्रेधा उडते, याचें आणखी एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे संस्कृत साहित्यशास्त्रांत काव्यांतील ' गुणां ' चें परिगणन करण्याच्या हास्यास्पद प्रयत्नाचें देतां येईल. भरताने आपल्या नाट्यशास्त्रांत श्लेष, प्रसाद, समता, समाधि, माधुर्य, ओजस् , सौकुमार्य, अर्थव्यक्ति, उदार व कांति या दहा काव्यगुणांचा उल्लेख केला आहे. ही वर्गीकरणाची धडपड अनवश्यक आहे, हा विचार बाजूला ठेवला, तरी एवढें मात्र स्पष्ट म्हणतां येतें की, हें गुणाचें परिगणन सर्वस्वी निर्दोष व परिपूर्ण नाही. सुशीलकुमार दे आपल्या ' Sanskrit Poeties (भाग २) मध्यें म्हणतात " In some cases it is difficult to see what Bharata means exactly by a particular ' guna ' and that the classification is by no means exhaustive nor free from overlapping ") गुणांचे हें वर्गीकरण कसें व्यर्थ होतें, याचा स्पष्ट पुरावा म्हणजे वर्गीकरणाचें वेड लागलेल्या पुढील संस्कृत–साहित्यशास्त्रज्ञांनी भरताच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दहा गुणाविषयक संज्ञांचे लावलेले निरनिराळे अर्थ हा होय. गुणसिद्धान्ताचा हिरिरीनें पुरस्कार करणाऱ्या वामनानें या दहा गुणविषयक संज्ञांतून भिन्न अर्थ काढले आणि म्हणून हे यांना " The enumeration of the literary excellences of diction, which differs greatly from that of Marathi, is neither exhaustive nor strictly logical " – असें त्याच्या वर्गीकरणाबद्दल रास्त विधान करावें लागलें.

खरं पाहिलें असतां तंत्रनिर्मितीचा आणि वर्गीकरणाचा हा सारा ह्पाप अगदींच गैरवाजवी आणि अप्रस्तुत आहे. या तंत्रवादी साहित्यविवेचकांना असें प्रामाणिकपणें वाटतें की, प्रत्येक साहित्यकार हा जेव्हा लिहितो, तेव्हा तो विशिष्ट-तंत्र-बद्ध वाङ्मयप्रकार म्हणजे कादंबरी वा नाटक वा लघुकथा वा भावगीत निर्माण करीत असतो. अस्सल साहित्याच्या सर्जनप्रक्रियेच्या दृष्टीनें विचार केला, तर ही तंत्रवाद्यांची भाषाच मुळी चुकीची आहे, असें म्हणावें लागतें. कारण खरा जातिवंत साहित्यकार हा केव्हाहि आपल्याला ठराविक वाङ्मयप्रकार तयार करावयाचा आहे, या हेतूनें लिहायला प्रवृत्त होत नसतो; तर बेनेडेटो क्रोचेच्या भाषेंत सांगायचें, म्हणजे त्याला अंतःकरणांतून अत्यंत आवेगानें असें जें स्फुरण होतें, त्याला परिपूर्ण आणि प्रभावी स्वरूपांत व्यक्त केल्याशिवाय राहावत नाही, म्हणून तो लिहितो. (" The true artist, in fact, finds himself big with his theme, he knows not how; he feels the moment of birth drawing near, but he cannot will it or not will it. ") आणि, हा आविष्कार जेव्हा शब्दबद्ध होतो, तेव्हा तो त्याला योग्य अशा स्वाभाविक बाह्यांगांतच होतो; एखाद्या वाङ्मयप्रकाराच्या पूर्वनियोजित साच्यांत तंतोतंत बसेल अशा रीतीनें तो कधींच शब्दबद्ध होत नाही. अर्नेस्ट रेमंड म्हणतो तेंच खरें की, " Literature is not a task discharged, or a game played, according to set rules; it is a vital spirit finding its expression in the mode it likes best; and all that matters is that the vital spirit should get out clearly, precisely and beautifully the emotion that is surging within him; and just in so far as he is vital will his emotion, if need be, burn through rules as a fire burns though tow. "

वाङ्मयवर्गीकरणपद्धतीचें अप्रस्तुतत्व आणि अशास्त्रीयत्व सिद्ध करण्याकरिता एक महत्वाचा वाङ्मयविषयक सिद्धान्त लक्ष्यांत ठेवला पाहिजे. तो हा की, प्रत्येक श्रेष्ठ वाङ्मयीन कृति ही सर्वस्वी स्वतंत्र असते. तिचें इतर कलाकृतींशीं साम्य असेल; पण त्या साम्यांत तिचें वैशिष्ट्य नसून बाह्यांगावरून तिच्या सारख्याच भासणाऱ्या इतर कलाकृतीहून तिच्यांत जो वेगवेगळेपणा प्रतीत होतो,

★ कलात्मक मुद्रणाचें केन्द्र ★

महेश्वर मुद्रणालय

अमरावती

★ बाईंडिंग
★ रूलिंग
★ पुस्तक छपाई
★ नोट पेपर्स, पत्रिका,

फॉर्म्स्, रजिस्टर्स आणि सर्व प्रकारची छपाईचीं कामें

विश्वासाने व तत्परतेने करून देण्यांत येतात.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्याच्या सृष्टींत

'साहित्यानंद'

● या नवीन सदरांत पत्ररूपाने वाङ्मय चर्चा करण्यांत येणार आहे. हीं पत्रें लिहिणाऱ्या व्यक्ति काल्पनिक आहेत. त्यांत कुणीहि स्वतःचें प्रतिबिंब पाहूं नये. या पत्रांवरून वाङ्मयचर्चेव्यतिरिक्त त्या त्या पत्रलेखकाचें व्यक्तिदर्शनहि होईल.

हीं पत्रें पाठविणारे 'साहित्यानंद' हे वाङ्मयप्रेमी व्यासंगी गृहस्थ आहेत. त्यांचें हें सदर वाचकांस आवडेल, अशी आशा आहे.

या सदरांतून व्यक्त होणाऱ्या सर्व मतांची जबाबदारी 'साहित्यानंदां'कडे आहे. त्यांची सर्वच मतें संपादकास मान्य आहेत, असें समजण्यांत येऊं नये. विशेषतः कम्युनिस्टांबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन संपादकांस सर्वस्वीं अमान्य आहे!

* * *

१

श्रीज्ञानेश्वर प्रसन्न

वरुड

ता. २०–५–४७

चि. अहल्येस अनेक आशीर्वाद.

तुला मीं मागेंच कबूल केलें होतें, त्याप्रमाणें, आज तुझ्याकडे रजिस्टर्ड पार्सलने राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरीची प्रत पाठविली आहे. सध्या तुला सुटीच आहे. तेव्हा सबंध ज्ञानेश्वरी वाचून टाकावी. तुला परीक्षेला पहिला अध्याय नेमलेला असल्यामुळे तुला या वाचनाचा अवश्य फायदा होईल.

मुली, वरचेवर मी तुला संतवाङ्मयाचें पठण, श्रवण आणि मनन करण्याचा उपदेश करीत असतों, तो तुझें पुढील भवितव्य लक्ष्यांत घेऊनच ना! गतभर्तृकांचं जिणं मोठं कठीण असतं. त्यांत पुन्हा तूं तरुण. नानाप्रकारच्या मायामोहांना तुला तोंड द्यावें लागणार; त्याकरिता मन खंबीर पाहिजे आणि त्याकरिताच आस्थेने आणि श्रद्धेने संतवाङ्मयाचीं पारायणें केलीं पाहिजेत.

तुझ्यासारख्या अलीकडल्या कॉलेजमधील शिकणाऱ्या मुली संतवाङ्मयाचं नांव काढलं कीं, नाकं मुरडतात आणि कांही आधुनिक यशवंत कवींनीं लिहिलेल्या चटोर प्रेमगीतांवर मात्र फिदा होतात! मला वाटतं, त्यांना चांगल्या काव्याची पारखच नाही! संतकाव्य हें उत्कृष्ट काव्य आहे. ज्यांना संतकाव्याची गोडी नाही, त्यांना कोणत्याच काव्याची गोडी असणें शक्य नाही; आणि, ज्यांना कोणत्याच काव्याची गोडी नाही, त्यांच्या ठिकाणीं साधं नागरपणहि नाही, असं मी म्हणेन! तुमचा तो इंग्रजी टीकाकार आहे ना हॅज्लिट नांवाचा, तो म्हणतो: "He, who has a contempt for poetry, cannot have much respect for himself or for anything else."

आपल्या मराठी लोकांचं परम भाग्य कीं, आपल्या मराठी भाषेंत ज्ञानेश्वरीसारखा 'एकमेवाद्वितीयम्' असा काव्यग्रंथ निर्माण झालेला आहे. त्याची योग्यता मी पामर काय वर्णन करणार? ज्ञानेश्वर हे "नस्ता कवीचा व्यापार। तरी कैचा अस्ता जगदुद्धार। म्हणोनि कवि हे आधार। सकळ सृष्टीशीं॥"– अशा कोटींतले कवि आणि, त्यांचें काव्य "कीं हें अमृताचे मेघ वोळले। कीं हे नवरसाचे ओघ लोटले। नाना सुखांचे उन्चंबळले। सरोवर॥" या प्रतीचे, गीतेसारख्या अध्यात्मपर ग्रंथावर ही टीका असल्यामुळे ज्ञानेश्वरी हा रूक्ष ग्रंथ आहे, असें समजूं नकोस. त्यांत अध्यात्म आहे; पण त्या बरोबरच अनुपम "वाक्चातुर्य" हि आहे. "दिसो परम तत्त्व डोळां। पाहो सुखाचा सोहळा। रिघो महाबोध सुकाळा–। माजीं विश्व॥" एवढें उदात्त प्रयोजन त्याला लाभलेलें आहे. असो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्ञानेश्वरीचें माहात्म्य वर्णन करीत बसलों, तर एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. तरी पण माझ्या पत्रांतून मी तुला ज्ञानेश्वरीची व एकंदर संतवाङ्मयाची महति पटवून देत जाईन. तूं मात्र मी पाठविलेल्या ज्ञानेश्वरीचें नियमानें वाचन करीत जा. वाचन सुरू केल्याचें कळीव.

तुझा मामा
लखुअण्णा

ता. क. आपल्या आप्पासाहेब शुक्ल्यांचा श्रीधर कम्युनिस्ट झाला, असें मला देवेंद्राच्या पत्रावरून कळलें, तें खरें आहे काय? खरें असेल तर एकुलत्या एका पोरानें म्हातारपणीं असा दगा दिल्यामुळे आप्पासाहेबांवर दुःखाचा डोंगरच कोसळला म्हणायचा!

लखुअण्णा

२

॥ श्री ॥

आर्वी
ता. २४-५-४७

प्रिय देवेंद्र यांस स. न. वि. वि. तीन दिवसांपूर्वीच ती. मामांचें पत्र आलें. त्यांत पुन्हा त्यांनी नेहमीप्रमाणे मला भक्तिभावानें संतवाङ्मय वाचण्याचा उपदेश केला आहे. सोबत ज्ञानेश्वरीहि पाठवून दिली आहे. मामा संतवाङ्मयाचे अगदी एकनिष्ठ भक्त आहेत. त्यांना संतवाङ्मयाची आणि विशेषतः ज्ञानेश्वरीची गोडी वाटणं स्वाभाविक आहे. त्यांना वाटतं—आणि अगदी मनापासून वाटतं—की, या अहल्येला ज्ञानेश्वरीची, तुकारामाच्या अभंगांची गोडी लागावी, तिचं मन त्यांत रमावं, तें वाचून या संसारांतल्या सुखाची क्षणभंगुरता पटावी आणि तिच्या वैधव्याच्या दुःखाचा भार थोडासा हलका व्हावा.

पण, देवेन्द्र, तुम्हाला स्पष्ट स्पष्टच सांगून टाकतें की, मामांचं हें वाटणं अगदी फुकट आहे. त्यांच्या शब्दाला मान देण्याकरिता म्हणून मी रोज नेमानं ज्ञानेश्वरी, तुकारामाचे अभंग, नाही तर मोरोपंतांची केकावली वाचतें; पण कांही केल्या माझं मन त्या काव्याशी समरस होत नाही! खरंच, का हो, या पुस्तकी पांडित्यांत आणि शाब्दिक बुडबुड्यांत दुःखविस्मृतीची आणि आनंदप्राप्तीची तहान भागविण्याचं सामर्थ्य असतं? मला, बाई, शंका वाटते.

मामा म्हणतात, काव्य या दृष्टीनेंहि 'ज्ञानेश्वरी' श्रेष्ठ आहे. मला तर पुष्कळ प्रयत्न करूनहि त्यांतलं काव्य प्रतीत होत नाही. इतकेंच काय, अगदी वरचा साधा अन्वयार्थ सुद्धा समजण्याची पंचाईत पडते; मग त्या अन्वयार्थाच्या आड दडून बसलेलं काव्य तें कुठलं कळणार?

अगदी खरं सांगू, देवेन्द्र, तुम्हाला मला किनई या तुमच्या संतवाङ्मयापेक्षा आपल्या फडक्यांच्याच कादंबऱ्या खूप आवडतात. त्यांची एकेक कादंबरी म्हणजे जणू कांही द्राक्षांचा घोस! चावायचा त्रास नाही, पचायला कठीण नाही, आणि चव तर तिच्यांतील किंचित्शा तुरटपणाच्या नी आंबटपणाच्या छटांमुळे कोणाहि रसिकाच्या तोंडाला पाणी सुटेल अशी! मी तर संतवाङ्मय वाचतां वाचतां कंटाळा आला की, खुशाल फडक्यांची एखादी कादंबरी वाचायला घेऊन बसतें आणि थोड्याच वेळांत माझ्या बुद्धीला आणि मनाला आलेला सारा शीण नाहीसा होऊन जातो.

तुम्ही लोक उगीचच हात धुऊन फडक्यांच्या मागे लागता आणि त्यांच्या वाङ्मयाला 'पलायनवादी' म्हणून वरचेवर हिणविता. असतील ते पळपुटे; पण म्हणून त्यांच्यामागे पळत सुटण्यांत आणि उगीच आपली शक्ति वेचण्यांत काय स्वारस्य आहे, तेंच मला कळत नाही! वऱ्हाडांतल्या साऱ्याच साहित्यकारांनी बिचाऱ्या फडक्यांचा पिच्छाच पुरविलेला दिसतो. त्या भवितव्याचा 'भाष्यकार' तर कांहींना कांही तरी निमित्त काढून फडक्यांना चिमटे घेत असतो. 'अभिरुचि' खरें पाहिलें तर वऱ्हाडच्या बाहेरची; पण फडक्यांची निंदा करणें हें तिनें आपल्या सदभिरुचीचें कायमचेंच लक्षण ठरवून टाकल्यासारखें दिसतें!

पण मी विचारतें, 'पलायनवादी' वाङ्मयाला साहित्यांत अजिबात कोठे स्थानेच नाही की काय? घरांतल्या केरकचऱ्याइतकीच त्याची किंमत आहे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

की काय ? खरोखर, तुम्हाला पलायनवादी वाङ्मयाबद्दल काय वाटतं, तें मला लिहून कळवाल का ?

श्रीधर थुटे कम्युनिस्ट झाल्याचें नी मुंबईला निघून गेल्याचें तुम्हाला कळलं असेलच. मला काय करायचं आहे म्हणा त्याच्या कम्युनिस्ट होण्याशीं वा न होण्याशीं! अगदी पहिल्याच ओळखीला माझ्या मनांत त्याच्याबद्दल तिटकारा उत्पन्न झाला होता आणि अजूनहि तो कायम आहे.

आपलें ग्रंथलेखनाचें काम अजून पूर्ण झालें नाही काय ? त्या कामांतून माझ्याकरिता म्हणून थोडासा वेळ काढून माझ्या पत्राला अवश्य नी सविस्तर उत्तर पाठवा; रुक्मिणी जशी देवीच्या देवळांत श्रीकृष्णाची वाट पाहात होती, अगदी तश्शीच मी तुमच्या पत्राची वाट पाहात आहें, असें समजा !

आपली नम्र

अहल्या

ता. क. पत्र लवकर पूर्ण करण्याच्या गडबडींत एक दोन शंका विचारायच्याच राहून गेल्या. परवाच मीं 'साहित्या'चा अंक वाचला. त्यांत रा. क्षीरसागरांचा 'सौंदर्यवादा'वर एक लेख आला आहे. त्या लेखांत त्यांनी तांबेंना सौंदर्यवादी कवि म्हटलें आहे. "सौंदर्यवादी" हा Romantic ला योग्य पर्याय आहे काय ? आणि तांबेंना Romantic कवि म्हणणें बरोबर आहे काय ? क्षीरसागर हे पट्टीचे विद्वान समजले जातात; तेव्हा साहजिकच त्यांच्या विचारांत बिनचूकपणा पुष्कळच असला पाहिजे. आपल्या वाचनांत तो लेख आला असेलच; तरी वरील प्रश्नांसंबंधीं आपलें म्हणणें कळवाल का ?

— अहल्या

३.

जय सोवियत मुंबई,

ता. ३०-५-४७.

दोस्त देवेंद्र यांस लाल सलाम. मी कम्युनिस्ट झाल्याची खबर तुझ्या कानावर आली असेलच. आईला आणि आप्पांना दुःख वाटणें स्वाभाविक आहे; पण मी पडलों बेछूट माणूस. आईबापांच्या, नातलगांच्या अन् मित्रांच्या दुःखाची मी कधींच पर्वा करणार नाही. माझ्या मनांत जें आलें, तें मी केल्याशिवाय सोडत नाही. असो.

मी कम्युनिस्ट झालों असलों तरी माझी वाङ्मयाची आवड मुळीच कमी झालेली नाही. माझ्या बाबतींत तरी ती आहे जित्याची खोड, ती कांही मेल्याशिवाय जायची नाही.

आता इथं आल्यापासून मीं सोव्हिएट वाङ्मयाचा आणि विशेषतः वाङ्मयविषयक दृष्टिकोनाचा पद्धतशीर अभ्यास करण्याचें ठरविलें आहे. 'Lenin on Art and Literature,' 'Literature and Marxsim,' Marxism and Poetry'— या सारखीं किरकोळ पुस्तकें आणि 'Soviet Literature' सारखीं नियतकालिकें वाचायला सुरवात केलीच आहे; त्याशिवाय, आम्हा कम्युनिस्टांत विशेष गाजलेलें कॉडवेलचें Illusion and Reality हें पुस्तकहि लवकरच वाचायला घेणार आहे. कॉडवेलचें पुस्तक आजपर्यंतच्या साहित्यशास्त्रीय विचारांत अभूतपूर्व क्रान्ति घडवून आणण्याच्या योग्यतेचें आहे, असें म्हणतात. तूं तें पुस्तक वाचलें असशीलहि; कारण तूं पडला 'इव्दान' माझें वाचून झाल्यावर आपण मग पत्रोपत्री त्या पुस्तकांतील विचाराबद्दल सांगोपांग चर्चा करूं. मग तूं होशील का या चर्चेला कबूल ?

अरे हो, ती अहल्या शहाणें भेटलीच, तर तिला माझा गुलाबी सलाम अवश्य सांग, माझ्यावर तर म्हणा तिचा पहिल्यापासूनच धुस्सा आहे. पण तिच्या धुस्स्याची पर्वा करायला इथें फुरसत आहे कोणाला ?

अच्छा ! आपल्या त्या जाडजूड ग्रंथांच्या वाचनांतून थोडासा तरी वेळ काढून माझ्या पत्राला उत्तर पाठवायला विसरूं नकोस; नाही तर याद राखं, हं !

तुझा दोस्त

भाई श्रीधर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

४

वंदेमातरम्,

उमरावती

ता. २६–५–४७

प्रिय अहल्येस सप्रेम आशिर्वाद,तुझें पत्र मिळालें. तुझ्या पत्रांत इतके महत्त्वाचे वाङ्मयविषयक प्रश्न उपस्थित झाले आहेत की, त्या सगळ्यांचीं उत्तरें देणें सध्या तरी मला, वेळेच्या अभावीं शक्य नाही पुन्हा, तुझ्या वाङ्मयविषयक विचारांत बराच गोंधळ उडालेला असल्यामुळे तो निस्तरायलाहि वेळ लागेल. वाङ्मयाच्या योग्य रसग्रहणाला रसिकाची कशी तयारी असावी लागते ? आणि, उच्चप्रतीच्या वाङ्मयाचे उद्दिष्ट काय असतें ?–हे दोन जिव्हाळ्याचे प्रश्न तुझ्या पत्रांतून सूचित झाले आहेत. त्यांची सविस्तर उत्तरें मी तुला सवडीने देईनच. सध्या एवढेंच सांगतों की, ज्ञानेश्वरीचें वाचन अवश्य चालू ठेवावें. सतत वाचनाने तुला त्यांतलि काव्य अनुभवास आल्यावाचून राहणार नाहीं.

फडक्यांच्या कादंबऱ्यांचा 'पलायनवाद' हा आता चर्चेचा शिळा विषय झाला आहे. उच्च प्रतीचें वाङ्मय तुझ्या वाचनांत न आल्यामुळेच तुझी फडके-वाङ्मयाची गोडी कायम राहिली आहे. खरें पाहिलें असतां फडके-वाङ्मयाची आवड असणें हें अविकसित, अदीक्षित (Untrained) आणि असंस्कृत अभिरुचीचें स्पष्ट लक्षण होय. हरिभाऊ आपट्यांच्या पूर्वींच्या 'मुक्तामाला', 'मंजुघोषा' वगैरे कथा-वाङ्मयाची जी किंमत, तीच आजच्या काळीं फडक्यांच्या वाङ्मयाची, हें लक्षांत असू द्यावें. पलायनवादी वाङ्मयाची सविस्तर चर्चा पुढील एखाद्या पत्रांत अवश्य करीन.

तूं उल्लेखिलेला क्षीरसागरांचा लेख मीं वाचलेला आहे. क्षीरसागरांना विद्वान् समजणारी तूं मला चांगलीच गाजरपारखी दिसतेस ! त्यांनी तांब्यांना Romantic म्हटलं, यांतच त्यांची विद्वत्ता झळकून गेली ! तांबे Romantic नाहीत आणि Romanticism ला 'सौंदर्यवाद' हा पर्यायहि मूळ संज्ञेच्या अर्थाची स्पष्ट प्रचीति देणारा नाही. या संबंधींचेंहि विवेचन मला नाइलाजास्तव पुढील पत्रावर ढकलणें भाग आहे.

माझें संकल्पित ग्रंथलेखनाचें काम या मुदतींत पूर्ण होईल, असें वाटत नाही; म्हणून मधल्या टप्प्यापर्यंत आणल्यावर मी तें सध्यां तरी स्थगित करणार आहे; मग मात्र मला आपला हा साहित्यविषयक पत्रव्यवहार करायला भरपूर सवड सापडेल.

श्रीधर कम्युनिस्ट झाल्याचें कळलें. तो हुच्च आहे, उद्धट आहे; बोलण्या-चालण्यांत त्याला संयम राखतां येत नाही; त्यामुळे तुला तो न आवडणंच स्वाभाविक आहे. बरं झालं, तो एकदाचा कम्युनिस्ट झाला आणि आपल्या जातीच्या लोकांत जाऊन मिसळला ! पोरगा आहे मात्र मोठा उमदा आणि होतकरू; पाहूं या, काय नशीब काढतो तें !

अगदी घाईघाईने हें पत्र लिहिलें आहे. सध्या चालू असलेलें प्रकरण पूर्ण होईपर्यंत तरी सविस्तर पत्रें पाठवायला फुरसत नाही. तूं "शहाणी"

शालेय
बाल
ललित
आणि
निबंध
वाङ्मय प्रसिद्ध करणारी
वऱ्हाड मध्यप्रांतांतील
एकमेव संस्था
ठाकूर आणि कंपनी लि.
अमरावती.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहेस, समजूतदार आहेस, म्हणून तुझ्या पत्रांना समाधानकारक उत्तरें देण्यांत दिरंगाई केल्याबद्दल तूं रागावणार नाहीस, अशी खात्री वाटते.

तुझा

देवेन्द्र.

५

वंदेमातरम्

उमरावती

ता. २-६-४७

वेड्या श्रीधरा —

तुझ्या वेडूटपणामुळे मी तुला नेहमीच वेडा म्हणत असे; पण आता तर तूं कम्युनिस्ट बनून वेडेपणाचा कायमचाच शिक्का लावून घेतलास ! वाङ्मयाचा नाद मात्र सोडूं नकोस. मार्क्स-लेनिन-कॉडवेल वगैरेंच्या वाङ्मयविषयक मतांचा चांगला अभ्यास कर. मीहि त्याचा यथामति अभ्यास करीत आहे. त्यावर आपण पत्रद्वारें अवश्य चर्चा करूं.

तुझ्या कम्युनिझमच्या तंत्रांत बसो किंवा न बसो, पण तुला तुझ्या आईबापांच्याकडे लक्ष दिलेंच पाहिजे. निदान माझ्याकरिता तरी तूं त्यांना वरचेवर पत्र पाठवून आपली खुशाली कळवीत जा. पत्राचें उत्तर जरूर पाठीव.

तुझा

देवेन्द्र.

हाक्यांतला वाघ !

वासुदेव वामन पाटणकर,
बी. ए., एल्. एल्. बी.

● रा. पाटणकर यांचा शिकारीवरील हा दुसरा लेख होय. यांत त्यांनी हाक्याची मार्मिक चर्चा केली आहे.

★ ★ ★

धाडसाची खरीखुरी हौस असणारा शिकारी हाक्यांत राहणेंच जास्त पसंत करील. व्यवस्थित हाका चालवणें ही साधी गोष्ट नव्हे. वाघाच्या मागोमाग ५०-६० कदम अंतरावरून त्यास हाकलणें यांतील गम्मत प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय कळणें कठीण आहे ! आणि, खरें सांगावयाचें म्हणजे मी तरी फिरून हाक्यांत राहण्याचें पत्करणार नाही ! इतकेंच नव्हे, तर बिचाऱ्या हाकेवाल्यांच्या जिवावर मचानीवरून निर्धास्तपणें शिकार करण्याचा प्रघात जितक्या लौकर बंद होईल, तितका बरा, या मताचा मी आहे ! जित राष्ट्रांतील गुलामांच्या जीविताची कवडी-किंमत मानणाऱ्या साहेब लोकांचा तो एक शिकारीचा अमानुष प्रकार आहे ! असो.

अनुभवान्तीं खऱ्या ठरलेल्या वाघाच्या ज्या कांही स्वभावविशेषांवर हाक्यांतील मंडळी विश्वासून असतात, त्यांचें येथे वर्णन करण्याचे आज योजिलें आहे.

आपल्या पाठीमागे मंडळी जमावाने चालून येत आहे, असें कळल्यावर वाघ उठून हळूहळू चालूं लागतो. असा तो पुष्कळ दूर चालेल. प्रथम ही मंडळी उगीचच ओरडत येत आहे आणि आपण तिच्यामध्ये उगाच का सापडा, या विचाराने तो निमूटपणे अर्धा-एक फर्लांग चालत जाईल. त्यानंतर ही मंडळी खास आपल्यासच हुसकून लावीत आहे, असा तो अंदाज बांधील. आणि, या वेळेपासून तो सारखा पुढे न चालता मध्ये

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्ये थबकेल व सारखा मागे वळून पाहत पाहत पुढे चालेल ! यानंतरच्या त्याच्या पुढील चालण्यांत आणि वागणुकींत " मला तुम्ही विनाकारण सतावीत आहां !—याद राखून असा ! "–असा स्पष्ट स्पष्ट आविर्भाव येत राहील. आणि, येथूनच हाकेवाल्यांच्या धैर्याची खरी परीक्षा सुरू होते !

यानंतरच्या हाक्यांतच खरी गम्मत आहे. वाघ मधून मधून स्तब्ध उभा राहतो. असा तो उभा राहिल्याबरोबर साहजिकच हाकेवाले जिथल्या तिथे थबकतात. आपण हटलो नाही, म्हणजे ही मंडळी पुढे येत नाही, ही वाघाची कल्पना होऊं देणें अत्यंत धोक्याचें आहे ! त्याच्या मनांत भीति जोपर्यंत कायम आहे, तोपर्यंतच त्याला विवक्षित ठिकाणीं हाकलून नेतां येते ! वाघ असा नेटाने उभा राहिला की, सामान्यतः हाकेवाले आरडाओरड बंद करितात आणि कांही तर इतरांची पर्वा न करितां झाडावर चढूं लागतात. ज्यांना जमिनीवरून आमना-सामना वाघ पाहण्याचे किंवा मारण्याचे प्रसंग आले असतील, ते आरडाओरड बंद झाल्याबद्दल हाकेवाल्यांना खास क्षमा केल्याशिवाय राहणार नाहीत. भीतीची परमावधी म्हणजे काय, आणि तींत काय अवस्था होते, याची खरी कल्पना येण्यासहि शिकारीच्या सर्व प्रसंगांतून जाणें जरूर आहे. वाघाचा धाकच असा कांही विलक्षण असतो की, त्याकडे बघणारा मनुष्य त्यावेळपुरता तरी देहभान विसरून अगदी निश्चल आणि स्तब्ध उभा असतो ! असो.

वरील प्रकारें हाक्यांतील गलका मंदावल्याचे लक्ष्यांत येतांच अनुभवी हाकेवाले स्वतः ओरडून किंवा ढोल अगर पिपे वाजवून इतरांनाहि जोष कायम ठेवण्याबाबत सारखे प्रोत्साहन देत असतात. फिरून हाकेवाल्यांना अवसान चढतें आणि, त्या अवसानांत ते वाघ उभा आहे, याची पर्वा न करितां तसेच पुढे धडाडीने चालतात !

आपण थांबूनहि हाकेवाले फिरून अंगावर चालून येतच आहेत, असें पाहून वाघ फिरून पुढे पुढे चालूं लागतो. आणि, आता येथून सारखें सरळ चालण्यापेक्षा उजवीकडून किंवा डावीकडून बगल देऊन निघून जावें, म्हणून तो कोणत्यातरी एका बाजूने निघून जाण्याचा प्रयत्न करतो. वाघ असा निघून जाईल, म्हणून अगोदरच वाघाच्या दोन्ही बाजूंच्या झाडांवर माणसें बसवून ठेवलीं असतात. त्यांपैकी ज्या झाडाजवळून वाघ बाजूने निघून जाणार असेल, त्या झाडावरील माणूस एकदम टाळी वाजवतो, त्याबरोबर बिचकून वाघ एकदम परत मागच्या जागी येऊन फिरून पूर्वीसारखाच चालूं लागतो ! आता सरळ चालत गेल्याशिवाय आपल्यास गत्यंतर नाही, बाजूने पळून जाण्याचा प्रयत्न केल्यास झाडावरून कांही तरी धोका होण्याचा संभव आहे, अशी त्याची समजूत होते ! एका विवक्षित दिशेने ही मंडळी आपल्यास हाकलीत आहे आणि यांत या मंडळीचा कांही तरी उद्देश आहे, ही कल्पना वाघास आल्याशिवाय राहत नाही ! येथून पुढे मात्र तो अत्यंत नाइलाजाने आपल्या मनाविरुद्ध चालत असतो. या वेळेपासून आणखी एक सावधगिरी तो घेतो. मागे लिहिल्याप्रमाणे झाडावरील टाळीला बिचकलेला वाघ आता पुढे चालत असतां समोरच्या झाडावरहि दृष्टी टाकीत चालूं लागतो. आतापर्यंत झाडांवर दृष्टी टाकीत चालण्याचे त्याला सुचलेलें नसतें !

येथ पर्यंत वाघ मचानीच्यापासून सुमारें १५० कदमांपर्यंत येऊन पोचलेला असतो. त्याच्या समोरच रस्त्यावर एका रांगेने दोन-तीन मचानी झाडांवर व्यवस्थित बांधलेल्या असतात. त्यांच्या समोर बंदुकीच्या टप्प्यांत येण्याकरिता निदान ४० कदम पर्यंत तरी वाघ हाकलून नेणें जरूर असतें. येथपर्यंत तर सहीसलामत सर्व निभलें. येथून शिकारींतील खऱ्या धोक्याच्या प्रसंगास आरंभ होतो ! बंदुकीचा आवाज होईपर्यंत हाकेवाल्यांना वाघास दटावीत पुढे चालविणें भागच असतें !

यानंतर हाक्याचें भवितव्य खालील घटनांवर अवलंबून असतें. मचानीजवळ गेलेल्या वाघाची जर मचानीवरील शिकाऱ्यांकडे नजर गेली तर तो तात्काळ हाडहूड हाका फोडून किंवा बाजूने निघून जाईल ! आणि, या वेळच्या धांदलीचें वर्णन करणें कठीण ! वाघ आपल्यास भिऊन

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निसटत आहे, या कल्पनेवर सारखे त्याच्यामागे हुरळल्यासारखे लागणें शांत कांही विशेष नाही. रुळावरून एकदा ताकद लावून आगगाडीची 'वॅगन' पुढे ढकलली, म्हणजे ती लोटण्याला ज्याप्रमाणें फारसे श्रम लागत नाहीत, त्याचप्रमाणें एकदा धीटपणें दटावून वाघाला रस्त्याला लावलें, म्हणजे तो पुढे पुढेच जाणार! त्यानंतर विशेष धैर्याची जरूर नाही. पण एकदा का वरीलप्रमाणें निश्चयाने वाघ पलटला, म्हणजे त्यास फिरून पलटविणें जवळ जवळ अशक्यच! आणि, असा वाघ पलटविण्याचें ठरवून जो ठाण मांडून जागच्या जागी उभा राहील, त्याच्या प्राणावर बेतल्याशिवाय खास राहणार नाही!

वाघ पलटला, म्हणजे तो अतिशय वेगाने पलटतो. यावेळीं त्यास शांतपणें निघून जाण्यास ताबडतोब रस्ता मोकळा केला तर खैरियत! वाघ पलटल्यावर हाक्याची शिस्त बहुधा मोडून सर्व धांदल उडते! जो तो आपआपला जीव घेऊन पळूं लागतो! कोणी झाडावर चढूं लागतात, तर कोणी झाडावर चढतां चढतां घसरूं लागतात! त्यांतल्या त्यांत जेथून थोडासा रस्ता मोकळा दिसत असेल, तेथूनच निसटण्याचा निश्चय करून वाघ त्या दिशेने धावत असतो! दुर्दैवाने त्याच्या रस्त्यावर किंवा अगदी जवळपासच जर एखादा हाकेवाला असेल, तर त्यास पंजाचा एखादा फटकारा लगावल्याशिवाय वाघ खास राहणार नाही! फटकारा जर देतां आला नाही, तर माणसाच्या खांद्यापाशीं त्यास जबड्यांत धरून व हिसडा देऊन दूर भिरकाऊन दिल्याशिवाय तो सहसा पुढे जाणार नाही! इतका वेळ नाहक त्याला त्रास दिल्याबद्दल एवढीशीहि शिक्षा त्याने करूं नये, हा कुठला न्याय? मात्र एवढी गोष्ट नक्की की, याहि प्रसंगांत एखाद्यास मारूनच टाकावें, अशी त्याची बुद्धि नसते. रस्त्यांत आलेली अडचण फक्त दूर करावयाची, एवढेंच त्याचें धोरण असतें! त्यामुळे या प्रसंगांत वाघाने केलेले हल्ले बहुतेक प्राणांतिक नसतात.

वरील प्रसंगांतून निभावून जाण्याकरिता हाकेवाले अनुभवी असावे लागतात. पण सर्वच हाकेवाले अनुभवी नसतात. आणि, धैर्याच्या फाजील कल्पनेने अननुभवी हाकेवालेच हौसेने आपण होऊन हाक्यांत सामील होत असतात. Ignorance is bliss!—या वाक्याची सत्यता हाक्यांत कळते! असे जे अननुभवी लोक हाक्यांत असतात, त्यांच्यावरच हाक्याचें सर्व यशापयश अवलंबून असतें! हाकेवाल्यांच्या मनाचा अभ्यास केल्यास असें दिसून येईल की, अनुभवी हाकेवाले वरील लोकांस पुढे करून त्यांच्याकडूनच सर्व काम निभवून नेत असतात. आणि, संकटाची कल्पना नसलेले विचारे नवे हाकेवाले सरळ संकटांत सापडतात. मचानीवर बसलेले शिकारी लोक वाघाला अगोदर न दिसणें आणि त्याने न पलटणें हा केवळ योगायोग आहे! आणि, म्हणूनच वर लिहिलेला धोक्याचा प्रसंग अजीवात टाळणें हें कोणाच्याच हातीं नाही. पाऊस वेळेवर येणें किंवा न येणें यावर जसा हिंदुस्थानचा शेतकरी अवलंबून आहे, त्याचप्रमाणें वाघाची दृष्टी मचानीवरील शिकाऱ्याकडे जाणें न जाणें यावरच हाकेवाल्यांचे नशीव अवलंबून आहे, एवढें खरें! नाही म्हटल्यास १७–१८ फुटांवर जर मचानी बांधलेल्या असतील, तर तितक्या उंचीवर साधारणपणें वाघाची दृष्टि जात नाही, असें समजण्यास हरकत नाही. मचानीवर नवे शिकारी असल्यास त्यांच्या अंगास थरकांप सुटतो! घसा दाबून धरल्याप्रमाणें श्वासाचा कोंडमारा होतो! आणि, याचा एकंदर परिणाम म्हणजे सबंध मचान खलखल हलूं लागते!! यामुळे सहजगत्या न दिसणाऱ्या मचानीकडे वाघाची दृष्टि खास वळते! यासारखाच दुसरा हटकून घडून येणारा प्रसंग म्हणजे इतका वेळपर्यंत स्तब्ध बसलेल्या शिकाऱ्यास निदान एकदा तरी खोकला आल्याशिवाय राहत नाही! आणि मग वाघास आयताच मचानीचा सुगावा लागतो! निदान खोकल्याची तरी अशी कांही गम्मत आहे की, तो विचारा ज्या वेळेला येऊं नये, त्याच वेळेला नेमका येतो!

वरील विवेचनावरून कोणाचा विशेष अपराध नसतांहि हाक्यांत धोका उत्पन्न होणेंच कसें जास्त

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संभवनीय आहे, याची कल्पना येईल. आणि, म्हणूनच हाक्याची पद्धत कायद्यानें बंद करण्यांत यावी, याबद्दल कोणाहि अनुभवी शिकाऱ्याची शिफारस मिळण्यास हरकत नाही ! त्यायोगें अनेक गरीब हाकेवाल्यांचे जीव वाचविण्याचें श्रेय मिळेल ! जंगली लोकांबरोबर प्रत्यक्ष राहून शिकारीजीवनाचा डोकें शाबूत ठेवून अभ्यास केल्यास कांही अत्यंत उपयुक्त अशा सूचना करतां येणें शक्य आहे. मग लोक त्या मानोत वा न मानोत ! प्रत्यक्ष हाकेवाल्यांच्या जीविताशी संबंध असलेली विचारप्रणालि एकदा जनतेसमोर मांडायला हवीच. स्वतःचा विश्वास आणि रायफल इतक्या भांडवलावर पराक्रमाच्या केवळ हौसेखातर एखाद्यास स्वतःपुरती कोणतीहि परिस्थिति निर्माण करण्याचा खास अधिकार आहे ! आणि, असेच शिकारी निर्माण व्हावयास पाहिजेत ! पण एका व्यक्तीच्या शिकारीच्या हौसेखातर इतरांनी विनाकारण संकटांत पडणें कितपत न्याय्य आहे, एवढ्यापुरताच येथे विचार मांडला आहे.

ज्या वाघावर कधी हाका झालेला नाही, अशा वाघासंबंधींच वरील विचार मांडले आहेत. हाक्याचा अनुभव असलेला वाघ वर लिहिल्याप्रमाणें अर्थातच वागणार नाही. त्याचा विचार पुढे केव्हा तरी करूं. सध्या हाक्यांत धोके उत्पन्न झालेच, तर ते कसे आणि कोठून उत्पन्न होतात, एवढें कळलें तरी चालेल. हाकेवाले, झाडावरचे लोक (stops) वाघाचे स्वभावविशेष आणि मचानीवरील शिकारी-यांपैकी कोणत्याहि एका गोष्टीमुळे हाक्यांत भीषण परिस्थिति निर्माण होते ! म्हणून निर्विघ्नपणें हाका निभावून नेण्यास वरील चार गोष्टींचें व्यवस्थित ज्ञान असावें लागतें. त्यांपैकी कोणामुळे कसकसे प्रसंग उत्पन्न होतात, याबाबत प्रत्यक्ष घडलेल्या हकीकतींचीं वर्णनें यथावकाश देईनच.

• • •

महानुभाव-वाङ्मयाचें संशोधन

वामन नारायण देशपांडे

● या अंकांतील 'विष्णु भिकाजी कोलते' या लेखांत सौ. उषाबाई कोलते यांनी महानुभाव-वाङ्मय-संशोधकांवर कांही आरोप केले आहेत, त्यांस या लेखांत उत्तर देण्यांत आलें आहे.

* * *

प्रस्तुत अंकांत सौ. उषाबाई कोलते यांचा 'विष्णु भिकाजी कोलते' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत त्या लिहितात, "'भास्करभट्ट बोरीकर' या विवेचनात्मक ग्रंथामुळे तर त्यांनी (प्रा. कोलत्यांनी) महानुभाव-वाङ्मयाच्या संशोधनाला अभिनव अशी शास्त्रीय दृष्टि दिली. तत्पूर्वी महानुभावीय संतमहंतादिकांनी पुरविलेल्या माहितीवरच बहुतेक संशोधक विसंबून असत ! परंतु प्रा. कोलते हे ही माहिति उपलब्ध करूनच थांबले नाहीत, तर ती बरोबर आहे की नाही, याची शास्त्रीय दृष्टीने छाननी करण्याचा पायंडा त्यांनी पाडला. सौ. उषाबाई यांनी या अवतरणांत दोन आरोप केले आहेत :- (१) 'बहुतेक' (हा पळवाटीचा शब्द !) संशोधक संतमहंतादिकांनी पुरविलेल्या माहितीवरच विसंबून असत ! (२) ते उपलब्ध माहितीची 'शास्त्रीय दृष्टीने' छाननी करीत नसत !–या आरोपाचा येथे विचार करूं.

पहिला आरोप– 'बहुतेक संशोधक' म्हणजे उषाबाईंना कोण कोण अभिप्रेत आहेत, हें स्पष्ट होत नाही. प्रा. कोलते यांच्या 'भास्करभट्ट बोरीकर' पुस्तकांत डॉ. य. खु देशपांडे, मी व अंशतः

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. वि. ल. भावे यांजवर टीका आली आहे, ती लक्ष्यांत घेतां 'बहुतेक संशोधक' म्हणजे आम्ही तिघेच उषाबाईंना अभिप्रेत असूं, असें वाटतें. म्हणून या ठिकाणीं मी फक्त स्वतःविषयीं खुलासा करूं इच्छितों.

"संतमहंतादिकांनी पुरविलेल्या माहितीवरच विसंबून" राहणें म्हणजे काय, हें सौ. उषाबाई स्पष्ट करीत नाहीत. महानुभाव पंथीय महंतांनी दिलेल्या जुन्या ग्रंथांच्या स्वलिखित नकला (पोथ्या नव्हत) वापरण्यांत आल्या, असें त्यांना म्हणावयाचें असल्यास माझ्यापुरती ही गोष्ट फक्त तीन लेखांबाबत खरी आहे. हें मीं १९३९ मध्ये खामगांवच्या 'समाजसेवक' पत्रांत म. म. प्रा. दत्तोपंत पोतदार यांना उत्तर देतांना पूर्वीच जाहीर केलें होतें व तेंच येथे अधिक विस्ताराने सांगत आहे.

प्रथम थोडा पूर्वेतिहास कथन करणें जरूर आहे. कै. राजवाडे व कै. वि. ल. भावे यांचें लिखाण वाचून महानुभाव-वाङ्मयाकडे माझें लक्ष्य वेधलें. १९२५ मध्ये डॉ. य. खु. देशपांडे यांजशीं माझा परिचय होऊन त्यांच्यां मध्यस्तीनें कांही पंथीय महंतांशीं माझ्या ओळखी झाल्या. हे महंत आपलें प्राचीन वाङ्मय दाखविण्यास प्रायः नाखूषच असल्यामुळे त्यांच्याशीं फार जपून वागावें लागे! ते क्वचित् मूळ पोथ्या देत, पण कित्येकदा पोथ्या न देतां त्यांच्या स्वतः केलेल्या नकला देत. संशोधन-दृष्टि नसल्यामुळे म्हणा, किंवा इतर कारणांमुळे म्हणा, या नकलांत पुष्कळदा ढवळाढवळ करण्यांत येत असे! पण पडताळून पाहण्यासाठी मूळ पोथ्या उपलब्ध नसल्याने नकलांतील प्रक्षेप उमगण्यास आरंभीं-आरंभीं तरी कांही साधन नसे. यामुळे व अननुभवामुळेहि विश्वास ठेवून या नकलांचा मीं तीन लेखांबाबत उपयोग केला. मात्र सुचलें तेव्हा मीं सारें स्पष्ट सांगितलेलें आहे. उदाहरणार्थ, १९२७-२८ मध्ये 'विविधज्ञान विस्तारां'त महदंबेचे धवळे छापतांना ते माहूरचे श्रीदत्तराज-महंत यांच्या नकलेवरून छापले आहेत, असे मीं स्वच्छ नमूद केलें आहे!

नकलांवरून लिहिलेले माझे तीन लेख असे- (१) 'आद्य मराठी कवयित्री' (पुस्तक नव्हे, प्रबंध) - 'विविधज्ञान विस्तार,' जून १९२७. (२) 'महदंबेचे धवळे' - 'वि. विस्तार,' जुलै १९२७ पासून क्रमशः (३) 'शिशुपालवध-कर्ता भास्करं भट्ट कवीश्वराचार्य'-'वि. विस्तार,' आक्टो. १९२८. -हे तीन लेख वगळल्यास माझें महानुभाव-वाङ्मयविषयक सारें लिखाण मूळ पोथ्या स्वतः पाहून लिहिलेलें आहे.

मीं वापरलेल्या नकलांत ढवळाढवळ झाल्याचें प्रथम माझ्याच ध्यानांत आलें! यामुळे उपरोक्त तीन लेखांबाबत कांही तरी 'निष्कृति' करणें अवश्य आहे, अशी रुखरुख माझ्या मनाला लागून राहिली! पहिल्या दोन लेखांचें 'प्रायश्चित' मीं १९३५ मध्ये 'आद्य मराठी कवयित्री' हें पुस्तक छापून घेतलें. हें पुस्तक अस्सल पोथ्यांवरून तयार करण्यांत आलें, हें सांगणें नकोच. उरतां उरला भास्करभट्टाबद्दलचा तिसरा लेख. भास्करभट्ट व त्याचे ग्रंथ यांविषयीं प्रा. कोलते यांस अत्यादर असल्यामुळे १९३१ च्या सुमारास ते मजकडे आले असतां त्यांना मीं माझ्या या लेखासंबंधीचा खरा प्रकार सांगितला. त्याच आधारावर त्यांनी पुढे १९३५ मध्ये 'भास्करभट्ट बोरीकर' पुस्तकांत माझ्या 'विस्तारां'तील लेखाचें खंडन केलें! हें खंडन करण्याचें त्यांचें मुख्य साधन जें 'स्मृतिसमुचय' ग्रंथ, त्याची मूळ पोथीवरून बाळबोधींत मीं स्वतः केलेली नकलहि त्यांना मजकडूनच मिळाली होती! पण या गोष्टींचा त्यांनी पुस्तकांत स्पष्ट निर्देश न केल्यामुळे नकलांतील ढवळाढवळ मला स्वतःला मुळी उमगलीच नाही, एवढेंच नव्हे, तर माझें सारेंच महानुभाव-वाङ्मय-विषयक लिखाण खोट्या आधारावर तयार झालेलें आहे, असा वृथा गैरसमज प्रसृत झाला! आता, प्रा. कोलते यांनी हा उल्लेख मुद्दाम केला नसेल, असें मला म्हणावयाचें नाही. मी येथे फक्त वस्तुस्थितीचें दिग्दर्शन करीत आहे, एवढेंच.

'शिशुपालवधां'दिकांतील शकमित्यांतील प्रक्षेप-वा हस्तक्षेप! - मात्र मला उमगला नाही, तो

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. कोलते यांसच प्रथम उमगला, हें नमूद करणें अवश्य वाटतें.

विशेष मौजेची गोष्ट ही की, संतमहंतादिकांच्या नकला वापरल्यामुळे माझीच फसगत झाली, असें नव्हे, तर खुद्द प्रा. कोलते यांचीहि तशीच फसगत झाली आहे ! 'भानुविजय' नांवाच्या बनावट ग्रंथाचा उपयोग करून 'विविधज्ञानविस्तारा'च्या ऑगस्ट १९३२ च्या अंकांत प्रा. कोलते यांनी भास्करभट्टाविषयीं माहिती दिली आहे ! स्वतः त्यांनीच हा सर्व वृत्तांत 'भास्करभट्ट बोरीकर' पुस्तकांत दिला आहे ! ज्या कारणांमुळे माझी आरंभीं फसगत झाली, त्याच कारणांमुळे कोलत्यांचीहि फसगत झाली, हें काय निराळें सांगावयास हवें !

दुसरा आरोप–पूर्वीचे संशोधक उपलब्ध माहितीची 'शास्त्रीय दृष्टीनें' छाननी करीत नसत, हा सौ. उषाबाईंचा दुसरा आरोप आहे. किंबहुना, पूर्वीच्या संशोधकांना 'शास्त्रीय दृष्टि' नव्हतीच, असा व्यापक आरोप त्यांनी केलेला असून ही दृष्टि प्रा. कोलते यांच्या 'भास्करभट्ट बोरीकरा'ने दिली, असेंहि त्या म्हणतात ! माझ्यापुरतें बोलावयाचें तर, माझें "आद्य मराठी कवयित्री" हें पुस्तक प्रा. कोलते यांचें 'भास्करभट्ट बोरीकर' हें पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वीच बाहेर पडलें असून त्यावर खुद्द प्रा. कोलते यांनी तें 'शास्त्रीय पद्धतीनें संपादिलें' असल्याचा अभिप्राय दिलेला आहे ! ('आद्य मराठी कवयित्री', पान ५९ पहा.) कदाचित् प्रा. कोलत्यांचा हा अभिप्राय सौ. कोलत्यांना संमत नसावा !

प्रा. कोलते यांचीं स्वतःचीं पुस्तकें शास्त्रीय दृष्टीचीं आहेत, असें म्हणणें निराळें; आणि, इतरांचीं पुस्तकें तशीं नसून त्यांना 'शास्त्रीय दृष्टि' कोलत्यांच्या 'भास्करभट्ट बोरीकरा'ने दिली, असें म्हणणें निराळें !

खेरीज, वीस–पंचवीस वर्षांपूर्वी महानुभाववाङ्मय-संशोधन हें इतकें प्राथमिक अवस्थेंत होतें की, त्यांत छाननी करण्यास फारच थोडा वाव होता, हा मुख्य मुद्दा विसरतां कामा नये. त्यावेळीं मिळेल ती माहिती वाचकांपुढे ठेवणें एवढेंच शक्य होतें ! आज तरी सर्वच बाबींची छाननी करण्यास पुरेसा वाव कुठे आहे ?

— याप्रमाणें माझ्यापुरता खुलासा केलेला आहे. इतर संशोधकांच्या बाबतींतहि अधिकृत खुलासा होणें अगत्याचें आहे. पोथ्यांऐवजीं नकलांचा उपयोग करून छापलेलें लिखाण कोणतें, याचा खुलासा अभ्यासकांच्या सोईसाठी होणें जरूर आहे. जें लिखाण केवळ नकलांवरून लिहिलेलें असेल, त्याचें मूळ पोथ्यावरून पुनर्मुद्रण व्हावयास पाहिजे. असें झालें तरच अभ्यासकांच्या हातांत अधिकृत संहिता (Text) दिल्यासारखें होईल.

आज काल झपाट्यानें बदलेला आहे. महानुभाव-वाङ्मयाचें संशोधन वीस-पंचवीस वर्षांपूर्वीपेक्षा पुष्कळच अधिक झालेलें आहे. अर्थात् पंथीय संतमहंतादिकांची पूर्वीची 'हळुवार मनोवृत्ति' आज राहिली नसेल, अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. म्हणून आता 'सत्य' हें पूर्णरूपानें प्रगट होण्याचा काळ आलेला आहे, यांत शंका नाही.

सौ. उषाबाई कोलते यांनी मागील संशोधकांवर केलेल्या आरोपांमुळे मला खरोखरच आनंद झाला. कारण त्यांमुळे मला पुनः एकदा स्वतःपुरता खुलासा करण्याची सुसंधी प्राप्त झाली. अर्थात् त्याबद्दल त्यांचें आभार मानणें अवश्य आहे.

• • •

'युगवाणी'त प्रसिद्धीसाठी
पाठवावयाचे लेख
कृपा करून......
श्री. वामन नारायण देशपांडे
संपादक
"युगवाणी"
यवतमाळ (वऱ्हाड)
या पत्त्यावर पाठवावेत.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वयंसेवक

गो. रा. दोडके, बी. ए.

● नागपूरचे प्रसिद्ध साहित्यिक रा. दोडके यांच्या या स्वतंत्र लघुकथेंत राजकीय आंदोलनांतील एक हृदयस्पर्शी प्रसंग वर्णिलेला आहे.

★ ★ ★

गांव कांही मोठ्यांतलं नव्हे, लहानसंच होतं. परंतु सविनय कायदेभंगाच्या चळवळीने त्या गांवांतील तरुण रक्तांत खळवळ उडवून दिली होती. झेंडावंदन, प्रभातफेरी, खादीप्रचार, परदेशी मालाची होळी व त्यावर बहिष्कार —वगैरे कार्यक्रम त्या गांवाने यशस्वी रीतीने पार पाडले होते. त्यानंतर गांवाने कायदेभंगाच्या चळवळीला आरंभ केला, कांहीं स्वयंसेवक तुरुंगांत गेले.

गढवाल-दिन जवळ आला. गांवांतील लोकांनीं शूर गढवाली शिपायांच्या स्मरणार्थ दिवस पाळायचे ठरविलें. लोकांच्या मनावर त्याग, सहानुभूति, कृतीचा परिणाम मृत्यूच असतांहि लोकांवर हत्यार न उगारण्यांत शिपायांनी प्रगट केलेलं धैर्य—या सगळ्या गुणांचा आदर्श ठेवायला आजच्या इतिहासांतून दुसरा कोणता समर्पक प्रसंग काढून दाखवितां आला असता ? —व्यवस्थापकांनी ठरविलें, सरकारच्या निषेधार्थ मिरवणूक काढायची. प्रत्येक स्वयंसेवकानें काळा बावटा हातांत धरायचा. अगदी शांत व संथ रीतीनें तुकडी तुकडीनें जायचें. कोणत्याहि प्रकारचा गोंधळ, आरडाओरडा होऊं द्यायचा नाही.

लगेच गढवालदिनाच्या तयारीला सुरवात झाली. कित्येकांनी आपल्या छत्र्या फाडून कापड काठीला बांधलें व बावटे तयार केले. असल्या लहानसहान गोष्टींवरून लोकांमधे कार्याविषयींचा उत्साह, व शिस्तीने कार्य करण्याची तयारी पूर्णपणें दिसून येत होती.

ज्या रविराजाने गहरवालच्या शूर शिपायांचं तेजस्वी उत्तर ऐकलं होतं, बाणेदार वागणूक पाहिली होती, तोच त्या खेड्यांतील उत्साह पाहण्याकरितां त्या दिवशीं लवकरच उगवला होता. परंतु स्वयंसेवक सैनिक त्याच्याहि अगोदर जागे होऊन आपआपल्या कामाला लागले होते. काळा बावटा घेऊन एकएक सैनिक गांवांतील टिळक-चौकांत उपस्थित होत होता. सूर्य झाडांच्या पानांतून किरणजाल विणीत त्यांच्या शिरोभागावर निघून गेला व पूर्ण तेजाने आकाशांत प्रकाशूं लागला. एवढ्या वेळांत सगळे स्वयंसेवक त्या चौकांत एकत्र झाले. ते आपसांत हसत, बोलत, खिदळत; पण या सगळ्या प्रकारांत शिस्त होती, संयम होता. वेडूटपणा अथवा धूम करण्याची प्रवृत्ति एवढ्याशा देखील प्रमाणांत नव्हती.

थोडा वेळ असाच गेला. नंतर एक काळा डगला त्या समुदायामधे येऊन उभा राहिला. त्याने हुकमी आवाजांत अधिकाऱ्याचा हुकुम वाचून दाखविला व तो एका झाडाला लावून तो शिपाई चालता झाला.

सगळे स्वयंसेवक त्या झाडाभोवती गोळा झाले. आज मिरवणूक काढूं नये, म्हणून सरकारी फर्मान निघालें होतें. स्वयंसेवक यायचा, वाचायचा व ओठ आवळून बाजूला व्हायचा. आणि त्याच वेळीं मनाशी निर्धार करायचा की, कांहीहि होवो मिरवणूक तर आज जाणारच, बघूं या आम्हांला कोण रोखतो तर ! एक स्वयंसेवक ओरडला, " वंदे मातरम् "

" महात्मा गांधी की जय ! " त्याबरोबर आवाजांत आवाज मिळवून सगळ्यांनी घोष केला. प्रत्येकांने आपल्या आवाजाने आपला उत्साह व निर्धार व्यक्त केला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आठाचा सुमार झाला. गांवांतला टिळक-चौक माणसांनी भरून गेला. टोळ्याटोळ्यांनी माणसं बोलत बसलीं होतीं. जणू काय, भारतमातेच्या चरणावर अर्पण करण्याकरितां गजरेच ठेवले होते. थोड्याच वेळांत सर्वाधिकारी तेथे आले. लोक त्यांच्याभोवती गोळा झाले, कांहीं वेळ गांधी भारतमाता यांच्या नांवाने जयघोष झाला. नंतर मनाईहुकमाविषयीं लोकांनी त्यांना वार्ता सांगितली. त्यांच्याहि कानांवर ती आधीच गेली होती. त्यांना तींत विशेष कांहीच वाटलं नाही. कार्यक्रम अंगावर घेतला, तेव्हाच सरकार तो नीट रीतीने पार पडूं देणार नाही, ही त्यांची कल्पना होती. कसल्याहि परिस्थितीला तोंड द्यायला स्वयंसेवक तयार आहेत, ही त्यांना खात्री होती त्यामुळे मिरवणूकबंदीच्या हुकमाचा सविनय भंग करायचें त्यांनी ठरविलें. आपला निश्चय त्यांनी सहकाऱ्यांना सांगितला व स्वयंसेवकांना कळविला. नंतर ते सर्वांना उद्देशून म्हणाले,

"मित्रहो, आज कसोटीचा समय आला आहे. आजवर केलेल्या तपस्येचं स्वरूप आज कळून येणार आहे. सरकार आज कदाचित् आपलं अत्याचारी स्वरूप प्रकट करील. त्याला धैर्यानं तोंड देणं आपलं कर्तव्य आहे. आपल्याला आततायी व्हायचं नाही. अत्याचाराचा प्रतिकार अनत्याचारानं, सूडाचा प्रतिकार शांतीनं, व विद्वेषाचा प्रेमानं करावयाचा आहे. पोलिसांच्या दंडुकेशाहीला सहनशीलतेनं पराभूत करायचं आहे. मित्रहो, ध्यानांत ठेवा, आपला लढा अपूर्व आहे. आणि म्हणूनच आपल्यावर विशेष जबाबदारी आहे. राष्ट्रमाता तुम्हांला यशस्वी करो!"

—सर्वाधिकाऱ्यांचें भाषण संपतांच एका स्वयंसेवकाने चारचार स्वयंसेवकांच्या रांगा एकामागे एक कवाइतीच्या शिस्तीने उभ्या केल्या. प्रत्येक स्वयंसेवकाने काळें निशाण आपल्या हातांत घेतलें व मुखाने एक उर्दू स्वातंत्र्यगीत गायला आरंभ केला. सगळे कूच करण्याच्या आवेशाने उभे राहिले. इतक्यांत एक पोलिसांची तुकडी आली व तिने स्वयंसेवकांभोवता कडं केलें. प्रत्येक शिपाई हातांत काठी घेऊन पवित्र्यांत उभा राहिला.

आतापावेतों सगळा गांव तो देखावा पाहायला लोटला होता. आबालवृद्ध, बायकामुली, चौकाच्या कडेकडेला उभ्या होत्या. केवळ त्याच गांवांतला जनसमूह आज तेथे उपस्थित नव्हता, तर आजूबाजूच्या आठदहा मैलांवरून लोक स्वातंत्र्यमोहिमेंतील लहानसा संग्राम पाहायला आले होते.

सगळ स्वयंसेवक नेत्याच्या सांगण्यावरून खाली बसले. पोलिसांचा त्यांना मिरवणूकीने न जाऊं द्यायचा निर्धार होता व स्वयंसेवकांचाहि जाऊं तर पुढेच नाहीतर बसल्या ठिकाणापासून एक पाऊलहि हलायचं नाही, हा बाणा होता! लोक आपल्या ठिकाणीं, शिपाई आपल्या ठिकाणीं अशाच स्थितींत बराच वेळ निघून गेला. पोलिसांच्या हातांतील काठ्या सैल झाल्या. शरीरांतील ताठरपणा गेला. मुद्रेवरचा कठोरपणा मावळला. जवळच्या एका वाड्याच्या पडवीवर वेळेचे

इंदिरेस-पत्रें

(द्वितियावृत्ति)

— लेखक —

पं० जवाहरलाल नेहरू

— अनुवादक —

वि. ल. बोडस,

बी. ए. बीटी.

किंमत १।।।, रु.

प्र. ठाकूर आणि कं० लि०

अमरावती

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ठोके पडूं लागले. पुष्कळांनी दहाचे ठोके मनाशी मोजले.

दूर अंतरावरून येणाऱ्या फटफटीचा आवाज त्या जनसंमर्दाच्या कानावर पडला. सगळ्यांचे कान टवकारले गेले. डोळे येणाऱ्या नादाच्या दिशेकडे वळले. आवाज वाढत वाढत खूप जवळ आला व एक फटफटी येऊन चौकांत थांबली. हा कोणीतरी मोठा अधिकारी असा लोकांनी त्याच्या फटफटीवरून, पोषाखावरून तर्क केला. अधिकाऱ्याने फटफटी उभी करून ठेवली. जमादार पुढे आला. त्याने " हजूर "ला सलाम दिली व तो नम्रपणें उभा राहिला. हुजूरने विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें नम्रपणानं दिलीं. अधिकाऱ्याने सभोवार नजर टाकली, जमादाराला कांही हुकूम केला, तो सर्वाधिकाऱ्यांजवळ गेला व दोघेहि साहेबांपुढे येऊन उभे राहिले. साहेब सर्वाधिकाऱ्यांना म्हणाले, " या टोळभैरवांना इथून उठायला सांगा, रहदारीला त्रास होतो आहे. "

" साहेब, ते शांत बसले आहेत. दंगाधोपा करीत नाहींत. रहदारीला पुष्कळ रस्ता आहे. "

" छट्, ती बघ, ती गाडी, रस्त्याच्या कडेकडेनं चालली आहे. अपघात झाला म्हणजे !— "

" पण आपणच तर त्यांना रोखून ठेवलं आहे. मी कसं त्यांना सांगूं ? पोलिसांच्या साखळीन समोरचा मार्ग बंद झाला आहे. पुढच्या पोलिसांनी केलेल्या हाताच्या कड्या काढून टाका. माझी मुलं आता चालायला लागतील. "

" अस्स काय ? तुम्हाला गुर्मी चढलेली दिसते. मग्रूर कुठला ! " तो जमादाराकडे वळून त्याला म्हणाला, " ह्याला गिरफ्तार करा. "

जमादाराने त्यांना बाजूला नेले ! स्वयंसेवकांनी व लोकांनी त्यांचा जयजयकार केला !

"दोन मिनटांच्या आंत जर रस्ता मोकळा झाला नाही, तर लाठी चालविली जाईल !"

दोन मिनिटें तेथे कर्तव्यकठोरतेचें वातावरण निर्माण झालें. नंतर सरकारी हुकूम वाचून दाखविण्यांत आला. थोडा वेळ पुन्हा शांतता राहिली. एकहि मनुष्य आपली जागा सोडून बाजूला झाला नाही !

" लाठी चालवा ! " —हुकूम सुटला.

शिपायांच्या लाठ्या प्रतिकारशून्य देहांवर फिरूं लागल्या. कांही माणसें, तिरिमिरी येऊन खाली पडलीं. कित्येकांच्या कपड्यावर रक्ताचे लाल डाग दिसूं लागले. एक चौदा-पंधरा वर्षांचा पोरगा स्वयंसेवकांमध्ये होता. त्याच्याकडेहि पोलिसांचा मोर्चा वळला, त्याच्यावर काठी उगारली गेली.

परंतु ती त्या पोरावर कोसळण्याऐवजी दोन हातांनी ती वरचेवर झेलून घेतली. त्या पोराचें रक्त आपल्या डोळ्याला दिसूं नये, तो भूमीवर कोसळतांना आपण बघूं नये, म्हणून प्रेक्षकांत उभा असलेल्या एका म्हाताऱ्याने चटकन स्वयंसेवकाच्या रांगेत प्रवेश केला व काठी वरचेवर झेलली. परंतु म्हातारा शिपायांच्या नजरेला पडतो न पडतो तोंच त्याच्या डोक्यावर तीनचार काठ्या कोसळल्या ! म्हातारा स्वयंसेवक देहभान सुटून एकाएकी खालीं धरणीवर कोसळला !

• • •

वर्गणीदारांस—

★ ★ ★

● युगवाणीचा अंक नियमितपणें दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतो. अंक न मिळाल्याच्या तक्रारी २० तारखेपर्यंत वाट पाहून कराव्यात. युगवाणीचा प्रत्येक अंक कसोशीने पुन: तपासून वर्गणीदारांस पाठविण्यांत येतो.

इत:पर सर्व जबाबदारी पोस्ट-खात्यावर !

व्यवस्थापक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'ला बेल सूझन'

लेखिका-जर्मेन बोमंट
अनुवादक-द. चिं. सोमण

● जर्मेन बोमंट ही फ्रान्समधील सध्याची प्रख्यात कादंबरीलेखिका होय; आणि गेलीं अठरा वर्षे 'मॅटिन्' या प्रकाशनाच्या संपादकमंडळांतहि हिचें नांव आहे. वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच हिने लेखनास आरंभ केला व प्रारंभीं कांही वर्षे ती इंग्लंडमध्ये रहात असे. हिच्या लघुकथा व कादंबऱ्या तंत्रदृष्ट्या अभ्यासनीय असून 'यथार्थ दर्शना' करिता प्रसिद्ध आहेत.

* * *

"पापाँ या सद्गृहस्थाची हकिकत ऐकायची आहे तुम्हाला ?–होय ना ? सांगतों मी ! अगदी सारें सांगतों आणि अगदी जसें घडलें तसें ! ना पदरचें तिखटमीठ लावीत की, पिसें उपटीत ! शक्य तितक्या थोड्या शब्दांत सर्व सांगणें हें माझें काम; तुम्हाला काय मत बनवायचें असेल, तें नंतर तुम्ही बनवीत बसा, समजलें ना ! ऐका तर मग—

आता जो तो छोटासा बंगला तुम्ही पाहून आलां, त्यावरून पापाँ कसा आहे–कसा होता म्हणा हवें तर–याची थोडीफार कल्पना तुम्हांला आलीच असेल. मी त्याचा मित्र म्हणून, मी तुम्हांला दाखविलेल्या माझ्या बंगल्याच्या अर्ध्या भागांत पापाँ राह्यचा ! भाडें देऊन हं ! आणि अगदी महिन्याच्या पहिल्या तारखेला द्यायचा तो भाडें !–थोडाफार पैसा होता पापाँजवळ व एक साधारणशी सरकारी नोकरीहि होती त्याला ! त्याने मला विकत दिलेलें तें सगळें सामान बघितलेंत ना ? पापाँचेंच तें सारें सामान ! त्या अगदी साध्या दोन लाकडी खुर्च्या, तें साधें टेबल ते दोन पितळी दिवे–विजेचे दिवे नव्हते घेतले त्याने !–अगदी साधी चौकट असलेल्या त्या तीन-चार रंगीत तसबीरा–हें सगळें पाहून पापाँच्या सांपत्तिक स्थितीची पूर्ण कल्पना करतां येईल तुम्हाला ! तसा पैसा नव्हताच विचाऱ्याजवळ पण असता तरी त्याने साधेपणा सोडला नसता हं ! भारी साधा आमचा पापाँ ! छानछोक, उधळेपणा, बेशिस्त मुळीच खपायची नाहीत त्याला ! साधें ठराविक जीवन जगत असे तो–आणि तेंच त्याला आवडे ! !

नोकरीवर रुजूं व्हायला रोज सकाळीं जायचा पापाँ, दुपारीं एका स्वस्त उपाहारगृहांत खायचा व संध्याकाळीं मात्र स्वारी घरीं यायची जेवायला ! ! अर्ध्या दिवसाकरिताच स्वयंपाकीण ठेवली होती. त्याने ! संध्याकाळचें जेवण आटोपलें की, त्याचा पाईप शिलगायचा आणि मग कधी बंगल्या-समोरच्या त्या चिमुकल्या बगीच्यांत, कधीं त्याच्या झोपायच्या खोलींतच तर कधीं माझ्या व्हरांड्यांत गप्पा चालायच्या आमच्या ! गप्पा म्हणजे काय, इकडल्या तिकडल्या हवेवरच्या वदंतांची चर्चा, फार तर राजकारण ! आम्ही दोघेहि अविवाहित, आम्हांला ना बायको ना पोर, इतकंच कशाला-ना कुणी आई बाप, भाऊबहिणी की, दुसरे मित्र ! ! - आम्ही एकमेकांनाच आप्तमित्र जें काय म्हणाल तें होतों-बसत असूं, मनमोकळ्या गप्पा मारीत वेळ सांपडला की, झालें !

कितीतरी वर्षे चालला होता हा आमचा क्रम ! आणि, पुढेहि अनेक वर्षे चालला असता. पण-साधी वाटणारी गोष्ट एखादें वेळीं किती मह-त्वाची ठरते पहा ! त्या दिवशीं जर पापाँने जुन्या खुर्च्या विकत घेणाऱ्याच्या दुकानीं जायचें ठरविलें नसतें आणि गंमत ही की, शेवटीं तो गेला नाहींच ! - तर आम्ही कांही दूर झालों नसतों. जाऊं द्या तें ! हं-तर काय सांगत होतों ? - आलें ध्यानांत ! - तर त्या दिवशीं पापाँला कुणी सांगि-तलें की, पॅरीसमध्ये साध्या लाकडी खुर्च्याच वापरायची फॅशन आदल्या दिवसांपासून निघाली आहे व पापाँजवळ होत्या तशा साध्या खुर्च्यांना भलता भाव आला आहे ! पॅरिसमधल्या या फॅशनच्या सार्थीची माहिती आहेच तुम्हांला !-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हसत हसतच पापॉं घरीं आला त्या दिवशीं व माझ्या खांद्यावर चापटी मारून व डोळे अर्धवट मिटून म्हणतो काय - " दोस्त ! ठरलें बरें का ! त्या दोन्ही लाकडी खुर्च्या उद्या टाकायच्या विकून आणि त्यांऐवजीं दोन वेताच्या नव्या खुर्च्या विकत घेऊन शिवाय थेंडे पैसेहि खिशांत टाकायचें, समजलं ? "

अर्थातच मला कांहीं कळेना ! मी अगोदर त्याला खुर्चीवर बसविलें व म्हटलें, " गृहस्था ! काय भानगड ही ? " - आणि, पापॉंनें मला सारें सांगितलें. पॅरिसमधल्या लोकांची त्यांच्या फॅशनच्या वेडाबद्दल यथास्थित चेष्टा करीत खूप वेळ हसत बसलों होतों आम्ही त्या दिवशीं ! -

शुक्रवार होता दुसऱ्या दिवशीं ! सकाळीं नोकरीवर जाण्यापूर्वी पापॉं माझ्या खोलींत येऊन म्हणाला - " दोस्त ! पॅरिसमधले वेडपट लोक अशा साध्या, लाकडी नव्या खुर्च्यांची किंमत काय देत आहेत, हें अगोदर पाहलं पाहिजे; हो, आपल्या खुर्च्या उघड उघड जुन्या ! त्या आपण जुनें लाकडी सामान घेणाऱ्याला विकणार, तो साफ फसवायचा आपल्याला ! नव्या खुर्च्यांची किंमत माहीत असायलाच हवी आपल्याला, नाही का ? " - पाहिलंत् ना पापॉं कसा होता तो ? ! - त्या दिवशीं संध्याकाळीं त्याच्याबरोबर जाणें शक्यच नव्हतें मला-पण गेलों असतों म्हणजे कदाचित्-पण कदाचितच हं !– त्याला मी ' ला वेल सूझन ' घरीं आणूं दिली नसती ! 'ला वेल सूझन ' बाईचं नांव नव्हे, हं ! तें होतें एका चिमुकल्या, शीडें लावलेल्या जहाजाचें नांव ! खेळांतलेंच होतें तें जहाज, पण अगदी छान, आणि गंमत ही की, एका साधारण मोठ्याशा बाटलींत ठेवलेलें होतें तें ! लहान तोंडाच्या बाटलींत हीं जहाजें, विमानें, कशीं भरतात तुम्हाला ठाऊक असेल कदाचित्. परंतु मी व पापॉं मात्र चकितच झालों ! ' सूझन ' दिसायला फारच मोहक होती, फार आवडली मला ती. पापॉंनें तर भरपूर किंमत देऊन विकतच आणली ती ! तेव्हा त्याला तर ती कमाल आवडली, यांत न ही. नव्या खुर्च्यांच्या किंमतीची चौकशी करायला पॉंपा गेला, ' ला वेल सूझन ' घेऊन आला व दुसऱ्या दिवशीं संध्याकाळपर्यंत स्वतःच्या जुन्या खुर्च्या विकण्याचा खटाटोप करण्यांत अर्थ नाही, असें ठरवून मोकळा झाला. ' सूझन ' मात्र त्याच्या बसण्या-उठण्याच्या खोलींत भिंतीला ठोकलेली एक लहानशी, काळें कुळकुळीत पॉलिश केलेली फळी भूषवूं लागली ! त्या फळीवर पूर्वी घड्याळ ठेवायचा पापॉं. पण ' सूझन ' आल्यावर घड्याळाची उचलबांगडी व्हायला मिनीटसुद्धा लागलें नाही.

कांहीं दिवस गेले. नंतर एक दिवस मी त्याच्या खोलींत गेलों, तों तो मूठ बसविलेल्या एका जाड भिंगांतून ' सूझन ' चें निरीक्षण करीत असलेला मला आढळला.

" दोस्त ! माल्वाहू गलबत आहे बरं कां हें ! गलबतांची बरीच माहिती मिळविली आहे मी अलीकडे ! हें बघ, हें सुकाणूं, ह्यानें गलबत वळवितां येतें, आणि हा नांगर बघितलास ? खूप जड असतो हा ! आणखी हीं शिडें बघ; आपल्याला वाटतें, पण ऐन तुफानांत हीं गुंडाळायचीं म्हणजे अचाट ताकद लागते, महाराज ! आणि, हा जो खांब दिसतो ना, याला म्हणतात डोलकाठी. आपली सूझन लहान आहे म्हणून डोलकाठी अशी लहान आहे; पण मोठ्या, खऱ्या गलबताची डोलकाठी म्हणजे ढगांना सुद्धा लागायची .... " काय नी काय ! कितीतरी माहिती सांगत होता तो!

आणखी कांहीं दिवस गेले !

"दोस्त, कांहीं म्हण, पण आपल्या 'ला वेल सूझन ' मुळे कल्पनाशक्तीला कांहीं नवीनच स्फुरण येतें बघ ! "

मी कांहींच बोललों नाही. अलीकडे अलीकडे पापॉं पुष्कळच बदलला होता. नेहमी आपल्याच विचारांत असल्यासारखा असायचा व येतां जातां ' सूझन ' समोर मिनीट अर्धा मिनीट उभा रहायचा !

या नंतर दुसऱ्या आठवड्यांतच एक दिवस तो मला म्हणाला, " दोस्त ! काल इथल्या नाविक पदार्थसंग्रहालयांत गेलों होतों मी ! तिथे जें कांहीं

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मी पाहिलें ना, तें जन्मांत विसरणार नाही बघ ! कसली रे ही आपली 'सूझन'! छे!" आणि नंतर तास-दोन-तास सारखा बोलत होता तो! कुणाला वाटायचें, या गृहस्थाचा जन्म समुद्रावरच गेला आहे. अगदी गोंधळून गेलें होतों मी त्या दिवसापर्यंत! एकेरी जीवनाचा भोक्ता असा तो पापॉं इतका बदलला कसा, हेंच मला समजेना!

त्यानंतर कांही दिवस अधूनमधून एखादा खलाशी घेऊन स्वारी घरीं यायची व पुढे पुढे तर कितीतरी वेळां खलाशावरोबर, मुद्दाम रजा काढून, तो लहानसहान सफरी करायचा!

अशाच एका, एक दिवसाच्या नदीवरच्या सफरीवरून परत आला आणि अचानक माझ्या खोलींत येऊन म्हणाला,—

—"काय रे हें आपलें जीवन! तेंच तें रोज करायचें, छे! कंटाळलों आपण! असे इथे पॅरिसमध्येच कुजून मरायची मुळीच इच्छा नाही मला! हिंदुस्थान, चीन, जपान, सगळीकडे प्रवास करणार आपण! समुद्राच्या लाटांवर तरंगत निरनिराळे देश पहात आपण हिंडणार! बस्स! ठरलें आपलें!"

— आणि, आला तसाच माझ्या खोलींतून तो निघून गेला. अलीकडे कांही दिवस आमच्या नेहमीच्या गप्पा बंदच झाल्या होत्या जवळ जवळ! घरीं असला म्हणजे केव्हाहि पहा, पापॉं पाईप ओढीत एखादें प्रवासवर्णन वाचत बसलेला आढळायचा किंवा त्याने अलीकडेच भिंतीवर लटकवलेल्या जगाच्या मोठ्या नकाशावर लाल निळ्या पेन्सिलने खुणा करतांना दिसायचा! मीहि मग त्याला त्रास देत नसे.

आणि, एक दिवस—

दुपारीं पापॉं पॅरिस कायमचें सोडून समुद्राच्या लाटांवर तरंगत प्रवास करायला म्हणून निघून गेला. त्याचें सर्व सामान विकत घ्यायला त्याने मला जवळ जवळ भाग पाडलें, 'ला वेल सूझन' "पापॉंची आठवण!" असें म्हणत मला दिली व "पत्र पाठवीत जाईनच!" असें रुद्ध कंठाने उद्गारून त्याने माझा निरोप घेतला—

संपली पापॉंची हकीकत! तो गेल्यापासून त्याचें एकहि पत्र मला निदान अजूनपर्यंत तरी आलेलें नाही! - काय झालें असेल, कुणास ठाऊक!!

'ला वेल सूझन' तुम्हांला मघाशीं बंगल्यांत दिसली नाही!! आणि कशी दिसेल? बंगल्यासमोरच्या त्या लहानशा बगीच्यांत मी तिला पुरून टाकलें आहे ना? 'का?' म्हणून विचारालच तुम्ही! त्याचें कारण असें की, पापॉं गेल्यापासून 'सूझन'ने मलाहि पापॉंप्रमाणेंच पूर्ण बदलून टाकलें व मीहि लवकरच...पण जाऊं द्या! तुम्हांला पापॉंची हकीकत ऐकायची होती ना? संपली सांगून सगळी हकीकत! 'ला वेल सूझन' ने तिसऱ्या कुणाला समुद्रावर पाठवूं नये, म्हणून मी तिला पुरून टाकली आहेच! हो, पापॉंची गोष्ट निराळी, एकटा जीव तो, पण प्रत्येकाने किंवा वाटेल त्याने लाटांवर तरंगून कसें चालेल? - नाही का?! -

• • •

साहित्यसमालोचन

संपादक

---

१. राजवाडे चरित्र (ले. व प्र. भास्कर वामन भट, चिटणीस राजवाडे संशोधन मंडळ, धुळें. किं. रु. १२) धुळ्याचे इतिहासाभ्यासक रा. भा. वा. भट यांनी इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचें हें चरित्र लिहिलेलें आहे. कै. राजवाडे हे महाराष्ट्रांतील अव्वल दर्ज्याचे प्रतिभाशाली विद्वान् होते. ते १९२६ मध्ये निधन पावले. त्यांची अनन्यसाधारण योग्यता लक्ष्यांत घेतां त्यांचें अधिकृत चरित्र त्यांच्या हयातींतच लिहिलें जावयास हवें होतें. पण तें तर राहोच, त्यांचा मृत्यु होऊन तब्बल वीस वर्षांचा कालावधि लोटल्यानंतर त्यांचें हें चरित्र प्रसिद्ध होण्याचा योग

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आला ! रा. भट हे राजवाड्यांचे निस्सीम चहाते असून त्यांना त्यांचा पुष्कळच सहवासहि घडलेला होता. अर्थात् अधिकृत माहिती पुरविण्याच्या दृष्टीने रा. भट हे राजवाड्यांचें चरित्र लिहिण्यास पूर्णपणें लायक ठरतात.

परंतु चरित्रलेखनास एवढी एकच लायकी पुरेशी नाही. चरित्रलेखन ही एक कला आहे आणि त्या कलेंत चरित्रलेखक तरबेज असला, तरच त्याची कृति उत्कृष्ट उतरणार. रा. भट यांच्यांत हें कसब नाही, असें मोठ्या दुःखाने म्हणावें लागतें ! भटांचा इतिहासाचा गाढ व्यासंग, त्यांची राजवाड्यांवरील भक्ति-वगैरे त्यांचे गुण जमेस धरूनहि मला हें विधान केवळ नाइलाजाने करावे लागत आहे !

भटांच्या या सर्व गुणावगुणांचा परिपाक प्रस्तुत ग्रंथांत उतरला आहे. या ६२४ पानांच्या प्रचंड ग्रंथांत राजवाड्यांविषयीं महत्त्वाची विपुल माहिती आलेली आहे. पण ती देण्यांत कसलीच शिस्त दिसत नाही ! या ग्रंथाचे एकूण दहा भाग आहेत, पहिल्या दोन भागांत राजवाड्यांचा जीवनवृत्तांत धावत्या पद्धतीने दिला आहे; आणि उरलेल्या आठ भागांत अवांतर गोष्टी हव्या तशा कोंबल्या आहेत ! —या एकाच उदाहरणावरून ग्रंथाच्या विस्कळित मांडणीची कल्पना येईल !

रा. भट यांची लेखणी म्हणजे खरीखुरी इतिहास संशोधकाची लेखणी आहे ! स्वतः राजवाडे किंवा त्यांचे पट्टशिष्य म. म. प्रा. दत्तोपंत पोतदार यांच्या लेखणींत जी आकर्षता आहे, ती भटांच्या लेखणींत अभावानेच तळपते ! यामुळे हा विस्कळित ग्रंथ वाचणें जास्तच कष्टाचें होतें !

एवढें बरीक खरें की, या ग्रंथांत राजवाड्यांसंबंधीं महत्त्वाची अशी विपुल माहिती आलेली आहे. ती जमेस धरून व तिच्यांत नवीन माहितीची भर टाकून दत्तोपंत पोतदारांसारख्यास उत्कृष्ट प्रतीचें राजवाडे-चरित्र सहज लिहितां येईल; पण दत्तोपंतांकडून अशी आशा करण्यास खरोखरच जागा आहे काय ?

२. मोळी–(ले. कुसुमावती देशपांडे; प्र.रा.ज. देशमुख, देशमुख आणि कंपनी, ११९१ शनिवार, पुणें २. किं. रु. २॥) प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या कांहीं शब्दचित्रांचा व ललित निबंधांचा संग्रह या चिमुकल्या पुस्तकांत केलेला आहे. शब्दचित्रें व ललित लेख लिहिण्यांत कुसुमावतीबाईंनी यापूर्वीच उदंड यश मिळविलें आहे. त्यांच्या त्या यशास साजेल असाच हा ‘ मोळी ’ संग्रह आहे. कुसुमावतीबाईंची सहानुभूति व्यापक असून त्यांच्या लेखनशैलींत एक प्रकारचा कलापूर्ण संयम असतो. यामुळे त्यांचें कोणतेंहि ललितलेखन सहृदय वाचकांस आनंददायक वाटतें.

‘ मोळी ’ मधील बहुतेक शब्दचित्रें वेचक व वेधक आहेत. परंतु त्यांतल्या त्यांत ‘ दमडी ’ या शब्दचित्राची तारीफ करावी तितकी थोडीच आहे ! कुसुमावतीबाईंनी हें एकच शब्दचित्र लिहिलें असतें, तरी त्यांचें नांव मराठी वाङ्मयांत कायमचें राहिलें असतें !

३. चमकत्या चांदण्या–(संग्राहक–प्रा. भा. म. गोरे, प्र. दामोदर त्र्यंबक जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणे. किं. रु. १॥) प्रा. भा. म. गोरे यांनी ‘ लघुतमकथा ’ या अभिनव वाङ्मयप्रकाराचा मोठ्या आस्थेने पुरस्कार करणें चालविलें आहे. सुमारें सहा वर्षांपूर्वी ‘ नवे निशाण ’ नांवाचा प्रातिनिधिक लघुतमकथांचा संग्रह त्यांनी प्रसिद्ध केला. आता हा दुसरा प्रातिनिधिक संग्रह त्यांनी प्रसिद्ध केलेला आहे.

‘ चमकत्या चांदण्या ’ संग्रहांत सत्तर लघुतमकथा घेण्यांत आल्या असून त्यांच्या लेखकांत वि. स. खांडेकरांपासून तों अगदी नवशिक्या लेखकापर्यंतचे जुने-नवे लेखक आढळतात. सर्वच लघुतमकथा सारख्या सरस नसल्या, तथापि कित्येक लघुतमकथा खरोखरच उत्कृष्ट आहेत.

लघुतमकथेचें कलाटणी हें जें एक अंग, तें कित्येक लघुतमकथांत दृग्गोचर होत नाही. मराठींतील लघुतमकथेचें कलाटणी हें वैशिष्ट्य विकल्पानेच मानावें लागेल, असें दिसतें.

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शंका : चर्चा : समाधान

१ मो. रा. जोशी
२ डॉ. य. खु. देशपांडे

● 'युगवाणी'त– व अन्यत्रहि–प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणावर 'शंका–चर्चा–समाधान' करणारा मजकूर या सदरांत प्रसिद्ध होतो.

* * *

१

मो. रा जोशी यांची शंका

'युगवणी'च्या जानेवारी १९४७ च्या अंकांतील 'संशोधकाचें पान' या सदरांत दुसऱ्या बाजीरावाची पत्नी वाराणशीबाई इच्या विषयींची टीपेंत दिलेली माहिती चुकीची आहे. कदाचित् प्रत्यक्ष संदर्भग्रंथ न पाहतां नुसत्या आठवणीनेच सदर माहिती दिली गेल्याने ती चूक झाली असण्याचा संभव आहे.

प. वा. राजवाडे यांनीच शोधून प्रसिद्धिलेल्या 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' या ग्रंथमालेच्या चवथ्या खंडांत शेवटीं 'पेशव्यांची वंशावळ' छापलेली आहे. तिच्यांत १८१ पानावर वारणशीबाईसंबंधाने पुढील उल्लेख आहे.—

'चवथी बायको वाराणशीबाई. फाटक रास्ते यांची कन्या. सवामयातैनांत लग्न झालें.'

तसेंच, 'इतिहास संग्रह' (मासिक) पुस्तक ५ वें, अंक ४-५-६, नोव्हेंबर, डिसेंबर १९१२ व जानेवारी १९१३ या जोड अंकांत 'ऐतिहासिक स्फुट लेख' या प्रकरणांत श्रीमंत दुसरे बाजीराव यांजविषयीं ब्रह्मावर्त येथील थोडीशी माहिती आलेली आहे. त्यांतहि 'चवथी बायको वाराणशीबाई. फाटक रास्ते यांची कन्या. लग्न इ. स. १८०६ त झालें'—असाच उल्लेख आहे.

'संशोधकाच्या पानां'त नमूद केलेल्या हरि रामचंद्र देवधर यांच्या कन्येचें नांव कुसाबाई असून ती बाजीरावाची पाचवी बायको होती.

—मो. रा. जोशी.

२

डॉ य. खु. देशपांडे यांचें उत्तर

'युगवाणी'च्या जानेवारी १९४७ च्या अंकांत 'वाराणशीबाई इचें पत्र' दिलें असून त्याखाली टीपेंत वाराणशीबाई ही हरि रामचंद्र दिवेकर ऊर्फ ढमढेरे याची मुलगी असल्याचें नमूद केलें आहे. बाजीरावास आलेलीं हीं प्रेमपत्रें संग्रहीत करणारा एर्स्किन याने "Bajirao was married to Waranasibai, the daughter of Hari Ramchandra Divekar or Dhamdhere by which name the family is best known...... most interesting letters in this collection are those of Waranasibai, her daughter Krishnabai and her sister Venubai familiarly known as Kusi..." असें लिहून ठेवलें आहे. त्यावरून जानेवारी–अंकांत वाराणशीबाई ही दिवेकराची मुलगी असल्याचें नमूद केलें आहे. पण रा. जोशी यांनी दिलेली माहितीच ऐतिहासिक दृष्ट्या खरी दिसते व वाराणशीबाई ही फाटक रास्ते यांची कन्या असल्याचें सिद्ध होतें.

एर्स्किनने वेणूबाई ऊर्फ कुशी ही वाराणशीबाईची बहीण असल्याचें लिहून ठेवलें आहे. त्याच आधारावर 'युगवाणी'च्या मे–अंकांतील 'बाजीरावास आलेलीं प्रेमपत्रें' या मजकुराच्या आरंभीं वेणूबाई बाजीरावाची मेव्हणी असावी, असें एर्स्किनचें मत नमूद करण्यांत आलें आहे व "या विधानास पुरावा सापडला पाहिजे," अशी सावधगिरीची पुष्टीहि जोडण्यांत आली आहे. रा. जोशी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांनी दाखविल्याप्रमाणें देवघराची कन्या कुसाबाई नांवाची असून ती बाजीरावाची पाचवी बायको असलेली दिसते. ही कुसाबाई म्हणजेच जर एर्स्किनच्या म्हणण्याप्रमाणें वेणूबाई असेल, तर मे-अंकांत वेणूबाईला 'परस्त्री' म्हटलें आहे, तें विधान दुरुस्त करून घ्यावें लागेल. मग वेणूबाई ही बाजीरावाची बायकोच समजावी लागेल.

—य. खु. देशपांडे

संपादकीय

लेखनाची तारीख १ जून १९४७

प्रा. न र फाटक यांचें भाषण

हैद्राबाद येथील महाराष्ट्र साहित्य-संमेलनाच्या अधिवेशनांत प्रा. न. र. फाटक यांनी जें अध्यक्षीय भाषण केलें, तें निराशाजनक होतें. या भाषणांत फाटकांच्या बहुश्रुतपणाच्या खुणा उमटल्या असल्या, तथापि त्यांत मनावर ठसेल अशा प्रकारें कोणत्याच प्रश्नाचें विवरण केलेलें नाही. त्यांनी अनेक प्रश्नांना स्पर्श केल्यामुळे त्यांना कोणत्याच प्रश्नाची मूलग्रामी चर्चा करतां आली नाही!

वऱ्हाडच्या प्रश्नाविषयीं प्रा. फाटक लिहितात, "वऱ्हाड व निजाम यांचे संबंध अगदी अखेरच्या काळांतले असून इंग्रजांनी त्या संबंधांवर गेलीं सव्वाशें वर्षे हरताळ फासून ठेवलेला होता व जोवर हिंदुस्थान देश सोडण्याचें त्यांच्या मनांत नव्हतें, तोंवर त्यांनी वऱ्हाडच्या निजामशाही मागणीचा अव्हेरच चालविला होता. इंग्रजांना हिंदुस्थान सोडण्याची आवश्यकता पटतांच वऱ्हाडला राज्यांतर करावें लागेल, अशा बातमीच्या वावड्या हवेंत उडून त्या देशांतील स्वातंत्र्याच्या उत्साहावर काळ्या भेसूर छाया नाचवीत आहेत. या छायांमागील प्रेरणा खरी ठरण्याचा प्रसंगच उपस्थित न होवो, अशी उमेद तूर्त आपण बाळगूं. त्या प्रेरणा कृतींत उतरूं लागल्याच, तर ज्या सामर्थ्यानें इंग्रजांना येथून जाण्याची जरूरी पटविली, तेंच सामर्थ्य उपयोगांत आणून या प्रेरणांचेंहि निर्माल्य करून टाकणें असाध्य नाही."

साहित्याच्या उद्दिष्टासंबंधीं बोलतांना प्रा. फाटक म्हणतात, "प्रत्येकाच्या वाट्याला श्रीमंती नसली तरी अन्नवस्त्राची ददात नसावी, प्रत्येकाच्या बुद्धीला ज्ञानाचा व देहाला शक्तीचा परमोच्च बिंदु गाठण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असावें, प्रत्येकाला आपल्या योग्यतेप्रमाणें मानवी कर्तृत्वाच्या कोणत्याहि क्षेत्रांत प्रवेश करण्याला व उत्कर्ष साधण्याला संधी असावी, दैन्य, दुःख, गांजणूक, छळ यांचा मागमूस देशांत कुठेंहि उरतां कामा नये-हीं आपल्या उद्धाराचीं अंगें लहान पोराला सुद्धा आज ठाऊक झालेलीं आहेत. अशा स्वरूपाच्या उद्धाराकरिता साहित्यानें आपलीं कर्तव्यें चोख बजावलीं पाहिजेत.

वाङ्मयाच्या अध्यापनांत जातीयता!

'भवितव्या'च्या २३ मे १९४७ च्या अंकांत 'वाङ्मय विहार' या सदरामध्ये 'भाष्यकार' लिहितात' —"कलेच्या गुणग्रहणाच्या क्षेत्रांत आम्हांस अत्यंत अनर्थावह अशी कोणती गोष्ट वाटत असेल, तर ती शाळा—कॉलेजांतील वाङ्मयाच्या अध्यापनांत नी अध्ययनांत जातीयतेचा शिरकाव होणें ही होय. असा शिरकाव झाला आहे, असें म्हणण्यास स्पष्ट पुरावा जरी आज उपलब्ध नसला, तरी पण मनुष्यमात्राची स्खलनशीलता आणि स्वार्थपरायणता लक्ष्यांत घेतां तसा तो होणें हें कांही अशक्य नाही, एवढें मात्र निश्चित आहे, असें सुचवावेसें वाटतें.—" अध्ययन—अध्यापनांत जातीयतेचा शिरकाव होऊं नये, असें सांगण्याची 'भाष्यकारा'वर ज्याअर्थी पाळी आली आहे, त्याअर्थी त्यांना तसा शिरकाव झाल्याचा किंवा होऊं पाहत असल्याचा कांही तरी सुगावा लागला असावा, असें अनुमान करणें भाग आहे. हें अनुमान खरें असल्यास या प्रकाराचा जितका निषेध करावा, तितका थोडाच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे! जातिभेद हा हिंदु धर्मावरचा काळाकुट्ट कलंक आहे. तो कायमचा दूर झाल्याखेरीज हिंदु समाज खऱ्या अर्थानें बलिष्ट होणें शक्य नाही. ही सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट असणारी गोष्ट आमचे अध्यापक-प्राध्यापक दृष्टीआड करीत असतील, तर ते आपणा सर्वांचें दुर्दैवच समजलें पाहिजे! अध्ययन-अध्यापनांत शिरलेली अगर शिरत पाहणारी जातीयता काँग्रेसच्या राजवटींत तरी मूळापासून उखडली गेली पाहिजे, असेंच कुणीहि म्हणेल.

कै. बापूसाहेब फडके

अकोल्याचे प्रसिद्ध नागरिक व माजी 'वऱ्हाड-समाचार' पत्राचे संपादक रा. नारायण खंडेराव ऊर्फ बापूसाहेब फडके हे २० मे रोजीं वयाच्या ८३ व्या वर्षी निधन पावले, हें कळविण्यास मला फार वाईट वाटतें. 'वऱ्हाडसमाचार' हें राष्ट्रीय वृत्तीचें पत्र होतें. कै. फडके यांनी तें अत्यंत निष्ठेनें व स्वार्थत्यागपूर्वक चालविलें होतें. अखेरीस तें सरकारी दडपशाहीस बळी पडलें! – बापूसाहेब हे विदर्भांतील वृत्तपत्रसृष्टींतील 'भीष्माचार्य' च होते. त्यांच्या मृत्यूनें विदर्भ-साहित्य-संघ व 'युगवाणी' यांना दुःख वाटत आहे.

चुकीची दुरुस्ती

गेल्या अंकीं 'वा. म. जोशी यांच्या नायिका' हा प्रा. कृ. नातु यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यावर त्यांचें नांव 'मनोरमा' असें छापलें गेलें आहे, त्याऐवजी 'मनुताई' असें वाचावें. या चुकीबद्दल मी मनुताईंची क्षमा मागतों.

* * *

संघवार्ता

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी, एम्. ए.
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ, यांजकडून.

संघाच्या घटनेंत वेळोवेळीं झालेली दुरुस्ती

विदर्भ साहित्य संघाच्या दर्यापूर येथे ता. २४-१२-४५ रोजीं भरलेल्या साधारण सभेनें आणि पुसद येथे ता. २६-१२-४६ रोजीं भरलेल्या साधारण सभेनें संघाच्या घटनेंत जी वेळोवेळीं दुरुस्ती केली ती तपशीलासह, संघ-सभासदांच्या माहितीकरिता, खाली देण्यांत येत आहे. संघाच्या मूळ घटनेची प्रत कार्यालयाकडे मागणी आल्यावर सभासदांकडे विनामूल्य पाठविण्यांत येईल. फक्त टपालखर्चासाठी पाऊण आण्यांचीं तिकीटें खालील पत्यावर पाठविण्याची कृपा करावी.

१. दर्यापूरच्या सा. सभेनें घटनेंत केलेली दुरुस्ती

१. नियम ६ प्रकार (६) वरील टीपेमधील 'आपल्या वार्षिक वर्गणीच्या वीसपट रकम एकदम किंवा सहा महिन्यांच्या आंत' या शब्दांऐवजी 'अनुक्रमें १०० किंवा २५ रुपये' असे शब्द घालावे; व टीपेंत '१०० रुपये अगर त्यावरील वर्गणी हप्तेवारीनें एक वर्षाच्या आंत दिली तरी चालेल' असें जास्तीचें वाक्य घालावें.

२. नियम ७ मध्ये '१५ दिवसांच्या आंत कार्यकारी मंडळानें' या शब्दांऐवजी 'एक महिन्याच्या आंत सरचिटणिसानें अध्यक्षाच्या निर्णयानुसार' हे शब्द घालावे.

३. नियम १० मध्ये 'सभासदांस' या शब्दापुढे 'सरचिटणीसानें' हे शब्द घालावे व 'देऊन कार्यकारी मंडळास' या शब्दांऐवजी 'दिल्यावरहि पूर्ण बाकी न दिल्यास' असे शब्द घालावे.

४. नियम ११ रद्द समजून तो पुढीलप्रमाणे वाचावा—"संघाची वार्षिक साधारण सभा सम्मेलनाच्या ठिकाणीं खुलें अधिवेशन भरण्यापूर्वी भरवावी व तींत संघाचा वार्षिक अहवाल व जमाखर्च सभासदांपुढे मंजुरीकरिता माडण्यांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यावा. याच सभेंत आधीचे अध्यक्ष नवीन अध्यक्षास अधिकारप्रदान करतील व तदनन्तर भरणारें सम्मेलन हें नवीन वर्षाचें व नवीन निवडलेल्या संघाध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली भरेल. ”

५. नियम २८ मध्ये ‘दोन महिने’ या शब्दांऐवजी ‘एक महिना’ हे शब्द घालावे व ‘सभासदांकडून.........कळविलें पाहिजे’ हे शब्द गाळून त्याऐवजी ‘तींतील प्रत्येक सभासद हा कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवार आहे असें समजलें जाईल’ हे शब्द घालावे.

६. नियम २९ रद्द समजून तो नियम असा वाचावा, “ मतदारांच्या यादींतील प्रत्येक सभासदाला अध्यक्षपदासाठी व कार्यकारी मंडळाच्या १४ सभासदांच्या जागांसाठी याप्रमाणे एकूण कोणत्याहि १५ उमेदवारांना मत देण्याचा अधिकार राहील. ही मतपत्रिका सरचिटणिसाकडे निवडणुकीच्या दिवसाच्या आधी १५ दिवस आली पाहिजे. त्यानंतर सरचिटणिसाने मतमोजणी करून मतानुक्रमें निवडून आलेल्या लोकांची सम्मति घ्यावी. अशा रीतीने ज्यांना अधिक मतें पडतील ते निवडून आले असें समजलें जाईल. ”

७. नियम ३१ (आ) मधील ‘किरकोळ’ हा शब्द गाळावा.

८. नियम ३७ मध्ये ‘जिल्ह्याच्या’ या शब्दापुढे ‘आणि तालुक्याच्या’ हे शब्द घालावे.

९. नियम ४७ मध्ये ‘शाखाध्यक्ष’ या शब्दाऐवजी ‘सम्मेलन शाखाध्यक्ष’ हे शब्द घालावे.

१०. नियम ४७ ऐवजी ४८ व नियम ४८ ऐवजी ४७ असे आंकडे घालावे.

११. नियम ५० मध्ये, “ परंतु जरूर पडल्यास......संघाने करावा ” या शब्दांऐवजी, “ अध्यक्षाच्या प्रवासाचा खर्च संघाने करावा, पण अध्यक्षाच्या भाषणाच्या छपाईचा खर्च सम्मेलनाच्या स्वागत मंडळाने करावा” असे शब्द घालावे.

१२. नियम ५० मध्ये पुढील वाक्य अधिक घालावे– “ सम्मेलनाचे स्वागत-सभासद हे संघाचे निदान साधारण सभासद असलेच पाहिजेत, पण त्यांना संघाची साधारण सभासद वर्ग (२) ची वर्गणी रु. २ ऐवजी रु. १ असावी.

१३. नियम ५९ मध्ये “ संघाच्या दोन तृतीयांश सभासदांचे ” या शब्दांऐवजी, “ संघाच्या अगर साधारण सभेंतील उपस्थित सभासदांच्या दोन तृतीयांश सभासदांचे ” असे शब्द घालावे.

१४. नियम ५९ मध्ये “ संघाचे सन्मान्य सभासद ” या शब्दांऐवजी, “ संघाचे आजीव सन्मान्य सभासद ” असे शब्द घालावे.

पुसदच्या साधारण सभेने घटनेंत केलेली दुरुस्ती

१. नियम १५ च्या आरंभीं पुढील शब्द घालावेः–“ संमेलनस्थानीं भरणाऱ्या वार्षिक साधारण सभेखेरीज. ”

२. नियम १५ च्या शेवटीं पुढील वाक्य घालावें, “ संमेलनस्थानीं भरणाऱ्या वार्षिक साधारण-सभेची सूचना व्यक्तिशः सभासदांकडे पाठविण्याची जरूरी नाही. मात्र या सभेंत नियम ११ मध्ये दिलेल्या कामाखेरीज दुसरें कांही काम करावयाचें असल्यास त्याची सूचना सभासदांस निदान आठ दिवस अगोदर दिली पाहिजे. ”

३. नियम ३४ च्या प्रारंभीं पुढील मजकूर घालावा, “ संघाचा जमाखर्च खजीनदाराने ठेवावा. ”

४. नियम ५० मध्ये - “ अध्यक्षांच्या प्रवासाचा खर्च संमेलनाने करावा व भाषणाचा खर्च संघाने करावा ” अशी पुनः दुरुस्ती करण्यांत यावी.

५. नवीन नियम नं. ६० पुढीलप्रमाणे घालण्यांत यावा, “ प्रत्येक वर्षीच्या संमेलनाचा वृत्तान्त संमेलन भरविणाऱ्या संस्थेने अगर व्यक्तींनी संमेलन भरल्यापासून सहा महिन्यांच्या आंत छापून प्रसिद्ध करावा. ”

रामकृष्ण बुकडेपो

★

सर्व प्रकारच्या

पुस्तकांचे विक्रेते

प्रार्थना समाज समोर, मुंबई नं. ४

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लवकरच प्रकाशित होत आहे !

ललित साहित्याद्वारें बहुजन समाजाचें

अंतरंग उघड करणारें

उदयोन्मुख लेखकांना उजेडांत आणणारें

मध्यप्रांत वऱ्हाडांतील पहिलेंच

मराठी मासिक

सागर

४॥. रु. वर्गणी भरून आजच

वर्गणीदार व्हा !

ठिकठिकाणी विक्रेते नेमणें आहेत

जाहिरातीचे खास सवलतीच्या दराबाबत

चौकशी करा !

पत्रव्यवहाराचा पत्ता:—

व्यवस्थापकः—"सागर" मासिक

अकोला (वऱ्हाड)

WANTED

Graduates able to teach Science, Maths, Geography and English to High School Classes. Apply stating qualifications and pay expected. Posts permanent.

Apply to—

The Head Master,

Prabodhan Vidyalaya, Daryapur

Dist. Amraoti, (Berar)

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९,४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ